म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 9295

REFBK-0007839
REFBK-0007839



# बिजली

वसंत बापट.

साधना प्रकाशन, मुंबई ११

सं. क्र. काव्य ९२७८

# बि ज ली

क्र. ९२७८
२८।५।५०

## निवडक कवितांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ७८३८

कवि

वसंत बापट

REFBK-0007839
REFBK-0007839

साधना प्रकाशन, आर्थर रोड, मुंबई ११

किंमत रु. २-८-०

★ कितीतरी वर्षं करून ठेवलेला संकल्प येथें पुरा झाला. माझ्या निवडक कवितांचा पहिला वहिला संग्रह मी सहृदय वाचकांच्या हातीं देत आहे. माझे मित्र श्री. लीलाधर हेगडे, श्री. मंगेश पाडगांवकर, श्री. रावसाहेब पटवर्धन, श्री. श्रीरंग वरेरकर व श्री. यदुनाथ थत्ते यांच्या प्रोत्साहनामुळें व साहाय्यामुळेंच मी हें काम करूं शकलों. कविवर्य कुसुमाग्रज आणि चित्रकार गोडसे यांनी प्रस्तावना व मुखपृष्ठाची जोड देऊन मला उपकृत केलें आहे. 'साधना प्रकाशन' चे व्यवस्थापक श्री. माधव आंब्रे व साधना प्रेसमधील श्री. तावडे प्रभृति कामगारबंधू यांचाहि मी मनापासून आभारी आहे. माझी कविता म्हणजे माझ्या मनाला जडलेला एक बहुमोल छंद. पण तिची व रसिक वाचकांची मनमिळणी व्हावी अशीच माझी मनोमन इच्छा आहे. अर्थोंहि काव्यं परकीय एव !

वसंत बापट

★

प्रथम आवृत्ति : सर्व हक्क स्वाधीन : मे १९५२

मुद्रक–प्रकाशक : श्रीरंग वरेरकर
साधना प्रकाशन, साधना प्रेस, आर्थर रोड, मुंबई ११.

**श्री वसंत बापट** आपल्या पत्रांत लिहितात, "माझी कविता फारशी लोकप्रिय झालेली नाहीं व ती कोणत्याहि अर्थानें युगप्रवर्तक नवी इत्यादि नाहीं; ती कविता असली म्हणजे पुरें असें मी मानतों." कवींची स्वतःच्या काव्यासंबंधींची भूमिका द्विविध रूपांत प्रकट होतांना आढळते. केशवसुतां-प्रमाणें ती केव्हां आव्हानात्मक व अभिमानाची असते तर केव्हां तांब्यांप्रमाणें अभिवादनात्मक व विनयाची असते. या दोहोंमध्यें बहुधा विसंवाद नसतो आणि कित्येकदा तर एकात्मताच असते. अनेकदा अभिमानच विनयाचें मुलायम शब्द परिधान करून बाहेर अवतरत असतो. वसंतरावांच्या विनयांत अभिमान आहे कीं नाहीं कोणास ठाऊक. परंतु कवीला अभिमान वाटावा असेंच त्यांच्या या काव्याचें वैभव व तेज आहे यांत मला शंका वाटत नाहीं. आज काव्यलेखन करणाऱ्या कवींमध्यें श्री. वसंत बापट यांचें स्थान फार सन्मानाचें आहे. "अंगीं अग्निशिखा, शिरावर तिच्या विद्युल्लतेचीं फुलें" अशा तेजस्वी स्वरूपांत प्रकट होणाऱ्या या कवितेचें मराठी रसिकजन हार्दिकतेनें स्वागत करतील असा मला विश्वास वाटतो.

आपली कविता लोकप्रिय, युगप्रवर्तक वा नवीनहि नाहीं असें कवि म्हणतात. परंतु काव्याचें श्रेष्ठत्व यापैकीं कोणत्याहि कारणानें स्वतंत्रतः निश्चित होत नाहीं. कवितेच्या चांगलें-वाईटपणाची अखेरची कसोटी एकच आणि ती म्हणजे तिच्यांतील काव्य ही होय. या काव्याची सर्वमान्य, समर्पक व्याख्या कोणी करूं शकला नाहीं, करूं शकणार नाहीं. परंतु काव्याचें स्वरूप ध्यानांत येण्यासाठीं ती आवश्यकच आहे असें नाहीं. काव्य अपरिभाष्य असलें तरी अनाकलनीय नाहीं. काळानें आणि अनेक प्रतिभाशाली कवींच्या लेखनानें हें काव्यस्वरूप निश्चित झालेलें आहे. पंधरा सोळा शतकांनंतरहि कालिदासाच्या मेघदूताचा आस्वाद आजचा रसिक तन्मयतेनें घेऊं शकतो. तुकारामाच्या रसग्रहणांत तीनशें वर्षांचा काळ व्यत्यय आणूं शकत नाहीं. या काव्यांत असें कांहींतरी असतें कीं जें स्थलकालनिरपेक्ष आहे. हें 'कांहींतरी' म्हणजेच

काव्याचा स्थिर, चिरंतन असा आत्मा होय. मानवी जीवनाच्या इतर अंगांप्रमाणें काव्यहि विकसनशील असतें. परंतु हा विकास त्या स्थिर तत्त्वाच्या आधारानें व अनुषंगानेंच व्हावयास हवा. काव्यांत नवीनतेला महत्त्व आहे यांत शंकाच नाहीं. परंतु या नवीनतेला कांहीं स्वभावसिद्ध सीमा आहेत. नाविन्याची आयात करण्याच्या इरेला पेटतांना या सीमांचें भान सुटलें तर काव्य लोपून नुसतें नाविन्यच शिल्लक राहील ! वसंतरावांच्या काव्यांत ही नवीनताहि आहे आणि त्या सर्वकालीन 'कांहींतरी'चाहि प्रत्यय आहे. काव्य या दृष्टीनें 'बिजली'चा उच्च दर्जा या दोन गोष्टींच्या सुंदर संगमामुळेंच सिद्ध होत आहे.

रंग आणि सुगंध असणें हा सर्वच फुलांचा स्थिर विशेष. परंतु प्रत्येक फुलाचा रंग वेगळा व सुगंधहि वेगळा. सत्काव्यांतहि अशाच प्रकारचें वैशिष्ट्य असतें. वसंतरावांच्या काव्याचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांतील सामाजिक तत्त्वज्ञान व या तत्त्वज्ञानाचा सावेश, हार्दिक पुरस्कार हें होय. काव्य आणि सामाजिक आशयाचा प्रचार यांत कांहींतरी मूलभूत वैमनस्य वा विरोध आहे असें कांहीं सांप्रदायिक मानतात. परंतु हें मत खरें नव्हे. चंद्राचा प्रकाश, उषःकालचे रंगविलास अथवा रमणींचीं मुखकमलें यांच्याइतकाच सामाजिक प्रश्नांनाहि काव्यविषय होण्याचा अधिकार आहे. कवि जेव्हां एखादा विचार आपल्या काव्यांतून मांडतो तेव्हां त्यानें तो बाजारांत जाऊन विकत आणलेला नसतो. तो त्याच्या व्यक्तित्वाशीं एकरूप झालेला असतो, त्याच्या भावसृष्टींत त्याला महत्वाची जागा मिळालेली असते. हा विचार व्यक्त करतांना, एखाद्या पुस्तकांतील तर्कबद्ध सिद्धांत तो मांडीत नाहीं तर आपल्या अंतःकरणांतील श्रद्धाच प्रकट करीत असतो. प्रबंधलेखकाहून कवीची भूमिका वेगळी, त्याचें कार्य वेगळें आणि त्या कार्याचा परिणामहि वेगळा. तो प्रबंधकाराप्रमाणें वादप्रतिवाद करीत नाहीं, इष्टानिष्ट पुरावे मांडीत नाहीं, अथवा तर्कांची सांखळी रचून अनुमान काढीत नाहीं. आपल्याला प्रतीत झालेलें सत्य तो श्रद्धेनें दिग्दर्शित करतो किंवा त्याचा प्रत्यय आणून देणारीं चित्रें काढून तें सूचित करतो. आगरकरांसारख्या प्रबंधकारांचे विधवाविवाहावरील लेख व तांब्यांसारख्या

कवींचीं विश्वगीतें यांचा एकत्रित विचार केला म्हणजे प्रबंधकार आणि कवि यांच्या भूमिकांतील ही भिन्नता चटकन् ध्यानांत येते. कवीची भूमिकाच वर म्हटल्याप्रमाणें व्यक्तिगत श्रद्धेची, भाविकाची असते. एखादें तत्त्व तो तर्कानें ग्रहण करील परंतु काव्यांतून त्याचें जें दर्शन आपल्याला होतें तें मात्र तर्कनिष्ठ असत नाहीं. कवीच्या अंतःकरणांतील श्रद्धांचा, भावनावेगाचा आणि कल्पनाशक्तीचा नवीन लवाजमा घेऊन तें काव्यांत अवतीर्ण होतें. सोन्याच्या बेढब लगडीचें रूपांतर सुवर्णकाराच्या हातीं सुंदर चंद्रहारांत होतें त्याप्रमाणें त्या तर्कसिद्ध तत्त्वाचें रूपांतर, तें कवीच्या अंतःकरणांतून बाहेर पडलें म्हणजे हृदयंगम काव्यामध्यें होते. दिव्यानें दिवा लागतो त्याप्रमाणें श्रद्धेनें श्रद्धा निर्माण होते. आणि म्हणूनच अखेरतः श्रेष्ठ कवि एखाद्या तत्त्वाचा प्रचार जितक्या परिणामकारकतेनें करतो तितका प्रबंधकार करूं शकत नाहीं. "वेदांचा तो अर्थ, आम्हांसीच ठावा, येरांनीं वहावा, भार माथां !" ही तुकारामाची गर्वोक्ति अशा प्रभावशाली आत्मप्रत्ययांतूनच जन्मास आली आहे. हा आत्मप्रत्यय कवीच्या सर्वच काव्याला प्रेरक असतो. प्रेमकाव्यांतसुद्धां कवि आपल्या प्रणयिनीचें प्रतिचित्र रेखाटत नाही, तिचें चरित्र देत नाहीं, तिच्या वजनउंचीची चिकित्सा करीत नाहीं अथवा तिच्या गुणावगुणांचें गणित मांडीत नाहीं. तिच्यासंबंधीं वाटणाऱ्या भावनात्मक व व्यक्तिगत आकर्षणाचें दर्शनच त्याच्या कवितेंतून आपल्याला होतें. सामाजिक आशयाच्या आवेशपूर्ण काव्याप्रमाणेंच प्रेमाचीं व जीवनांतील इतर सुखदुःखांचीं सुंदर गीतेंहि वसंतरावांच्या लेखणींतून बाहेर पडलीं आहेत त्याचें कारण हेंच होय.

सामाजिक तत्त्वज्ञान हें जर या कवींच्या काव्याचें प्रभावी वैशिष्ट्य, तर त्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप कोणतें हेंहि लक्षांत घेणें जरूर आहे. बिजलींतून व्यक्त होणारी जीवनदृष्टि प्रागतिक, व्यापक आणि सहानुभूतिमय आहे. प्रत्येक युगामध्यें सामाजिक प्रगतीचें एक सूत्र अनुस्युत असतें. इष्टानिष्टतेचा शब्दकूट कोणी कितीहि पाडला तरी, ग्रीष्मांतील वणव्याप्रमाणें हें सूत्र स्वतःच्या आवेगानेंच सतत पुढें जात राहतें आणि जातांना स्थितिनिष्ठेच्या जीर्ण गढ्यांचें

दहन करून टाकतें. हें सूत्र ज्याच्या ध्यानांत येतें, केवळ ध्यानांत येत नाहीं तर आंतरिक भावनेनें जो त्याचें ग्रहण करतो, त्याच्यासंबंधींची बौद्धिक निष्ठा व श्रद्धा ज्याच्या ठिकाणीं निर्माण होते असाच कवि त्या युगधर्मांचा उद्‌गाता आणि पुढील काळाचा प्रेषित होऊं शकतो. श्री. वसंतराव बापट यांना हें सूत्र जाणवलेलें आहे. ज्याप्रकारें जाणवायला हवें त्याच प्रकारें जाणवलेलें आहे. म्हणजे त्यांत औटघटकेची उसनवारी नाहीं, तर आंतरिक निष्ठेतून उत्पन्न झालेला जिव्हाळा आहे; आत्मप्रत्ययाच्या ऐरणीवरून उठलेले स्फुलिंग आहेत. कवि समाजक्रांतीचे पुरस्कर्ते आहेत आणि त्यांतच आजच्या युगधर्माचा त्यांना साक्षात्कार झालेला आहे असें मी मानतों. प्रगतीचें मूलतत्त्व या दिशेवरूनच निश्चित होऊं शकतें. वसंतरावांच्या काव्यामध्यें या तत्त्वज्ञानाच्या अनेक कला आपल्याला प्रकट झालेल्या दिसतात. किंबहुना त्यांच्या काव्याची प्रमुख प्रेरणा आणि त्याचें सामर्थ्य या जीवनदृष्टीमधेंच आहे.

सामाजिक समानता ही या तत्त्वज्ञानाची पायशिला आहे. विषमता, अर्थोपासना आणि दासधनीसंबंध यांवर उभारलेली समाजरचना नष्ट झाल्याशिवाय माणसाला सुखाचे दरवाजे मोकळे व्हावयाचे नाहींत अशी कवीची श्रद्धा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळालें. परकीयांच्या दास्यांतून त्याची मुक्तता झाली. परंतु या दास्याहूनहि अधिक भयावह, अधिक अधोगत अशा प्रकारची गुलामगिरी येथील समाजाच्या शरीराभोंवती दोन्ही हातांचा विळखा घालून बसली आहे. परकीयांशीं लढतांना स्वातंत्र्य हें साध्यरूप वाटावें हें योग्यच होय. परंतु राजकीय स्वातंत्र्य हें अखेरचें मंझिल नव्हे—

जोंवरी सुखाचा घास नसे सर्वांना
जोंवरी न उन्नत झाल्या अवघ्या माना
...जरि निघून गेले परके अपुल्या देशीं
आम्हीच आमुचे गुलाम हिंदुस्थाना !

दुसऱ्याशीं लढण्यापेक्षांहि स्वतःशी लढणें अधिक दुर्घट आहे. रूढ समाजरचनेनें असंख्य लोकांना उपासमारीच्या सरहद्दीवर तडफडत ठेवलें आहे

ही एकच तिची अनुषंगिक आपत्ति नव्हे. जे मधल्या आणि वरच्या थरांत आहेत त्यांचाहि तिनें अधःपात घडवून आणला आहे. धर्म, नीति, जाति, वंश वगैरेसंबंधींचीं खोटीं व विघातक मूल्यें तिनें प्रचारांत आणलीं आहेत. म. गांधींसारख्या संताच्या देवळांत धूप जाळून दाराशीं त्यांच्या संदेशाचा खून पाडण्याइतकी ती दांभिक आहे. साक्षात् सौंदर्याकडे पाठ फिरविणारी विकृति तिच्यांत आहे आणि जीवनकलहाच्या तीव्रतेंत माणसाचें व्यक्तित्व ठेचून काढणारी निर्घृणताहि तिच्या ठिकाणीं आहे. या व्यापारी संस्कृतीच्या हिंस्र जबड्यांत सांपडलेल्या मानवी संसाराची त्यांतून मुक्तता करणें म्हणजेच समाजक्रांति. हें समाजक्रांतीचें सामर्थ्य कोठून येणार ?—

या औतांतुन हातोड्यांतुन  या जात्यांतुन या पात्यांतुन
या दात्यांतुन या भात्यांतुन  या कामांतुन या घामांतुन
या अश्रूंतुन या अग्नींतुन

ठिणगी फुटेल जोसांत !

दलितांच्या दुःखांतून निर्माण होणाऱ्या या असंख्य ठिणग्यांचा वणवा पेटेल आणि त्या वणव्यांत, हिंस्र श्वापदांचें, जहरी सर्पांचें संगोपन करणारें जंगल जळून जाईल. दहनांत शुद्ध झालेल्या त्या भूमीवरच नव्या समाजरचनेचें मंदिर उभें राहिल. आजच्या युगधर्माचें साध्य हें आहे. कवीची ध्येयदृष्टि याच मंझिलावर खिळलेली आहे.

मराठी काव्यक्षेत्रांत आज नव्याजुन्याची रणधुमाळी आहे. त्यांत कोठल्याहि पक्षासाठीं शिपाईगिरी न करतां, दोन्हीमध्यें जें इष्ट व आवश्यक आहे तें आत्मसात् करण्याची अभिनंदनीय वृत्ति कवींमध्यें दिसून येते. अशा तऱ्हेचा हा उत्कृष्ट काव्यसंग्रह रसिकांच्या हातीं दिल्याबद्दल, या संग्रहाचा पहिला वाचक या नात्यानें मी श्री. वसंतराव बापट यांना धन्यवाद देतों.

**वि. वा. शिरवाडकर ( कुसुमाग्रज )**

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| माझी कविता | ९ | अमर आशा | ६३ |
| बिजली | १० | सोनापुरच्या भिंतीवरती | ६४ |
| सत्तावनचे वीर | ११ | केवळ सौंदर्य ! केवळ आनंद ! | ६७ |
| देशाची हांक | १२ | वादळ वाऱ्यापरी | ७१ |
| सदैव सैनिका | १३ | फिरली मर्जी | ७२ |
| शतकानंतर | १५ | नकळत तुमचे डोळे वळले | ७३ |
| पहांटेचें स्वप्न | १६ | तिची ही कहाणी | ७६ |
| महायान | २४ | फकिराची फिर्याद | ८१ |
| चालूं दे जयनाद | २६ | झेलमचे अश्रु | ८३ |
| स्वतंत्र्य कुठें स्वातंत्र्य ! | २८ | तुला नव्या जगाची आण | ९२ |
| जलउषा | ३२ | तेंव्हां आणि आतां | ९३ |
| गांधी मंदिर | ३५ | दक्षिण दिशेला | ९८ |
| अमर विहंगम | ४१ | बरी केली झांकपाक | १०१ |
| आईची वेदना | ४२ | आली जगबुडी आली | १०३ |
| पूर्णाहुतीचा तो दिवस | ४४ | ठोकळ्यांचें घर | १०५ |
| विभूतिपूजक | ४६ | खडकावरलें पिंपळपान | १०७ |
| झाला थोडासा उशीर | ४८ | साग शिल्पिन् | १०९ |
| ही सत्त्वपरीक्षा | ५० | फलश्रुति | ११३ |
| डोळे दिपले | ५१ | हिरवा मजला | ११५ |
| दख्खनची राणी | ५३ | जायचेंच ना | ११७ |
| हे रवींद्र | ५७ | जयकेतु | ११८ |
| माझ्या स्वप्नीं | ५९ | कांहीं घडे जगावेगळें | ११९ |
| दिवाळी | ६१ | मी एकला मी एकला | १२० |

नों. नं. १४९२३
२८०४५५३
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८३८
संदर्भ शाखा

## माझी कविता

माझी जीवनशांति भंगुनि सखी आली मनोमंदिरीं
तेव्हां कल्पलतेवरील तिजला मी अर्पिली मंजिरी
बोले हासुनि ती मला, " न सखया मी मंजिरीला भुले
माझी हौसच वेगळी, मज हवीं विद्युल्लतेचीं फुलें "

स्वप्नांचे शततंतु गुंफुन तिला शेला नवा मी दिला
" मी ती अग्निशिखाच नेशिन गडे, " सांगे तदा ती मला
नक्षत्रें नव आणुनी घडविलें जेव्हां तिला भूषण
" उल्कांचे दिसतील छान, " वदली, " पायांमधें पैंजण "

" प्रीतीचें मृदुपुष्प देउं तुजला ? " मी लाजुनीया पुसे
" छे छे " ती वदली, " स्यमंतकमणी आणून द्या ना कसे ! "
अंगीं अग्निशिखा, शिरावर तिच्या विद्युल्लतेचीं फुलें
उल्कांचीं पदिं पैंजणें नि मणि तो हातांत तीच्या खुले

ऐशी ती नटली, कसून तिजला मीही तदा भेटलों
तेव्हां मी जळलों, अजून जळतों, मी अमृतें पेटलों

# बिजली

बिजली नाचेल गगनांत  वादळ होईल जोसांत
जंगल जळेल वणव्यांत  मंगल होईल देशांत
बिजली कडाड गर्जेल  पाउस धडाड येईल
पाणी चढेल शहरांत  पाणी जिरेल शेतांत
बिजली वरून कोसळते  सावध हवेलि ढांसळते
जाइल हवेलि मातींत  घरटं राहील शाबूत
बिजली कुणाला जाळील  बिजली कुणाला उजळील
बिजली येईल अवचीत  न्याय करील जगतांत
बिजली कुठून येईल ?  वादळ कुठून होईल ?—

शेतकऱ्यांच्या शेतामधुनी, औतं फिरती, जमीन खणती,
लाख ऐरणी–घण खणखणती, घरांत घरघर जातीं फिरती,
भिंति लिंपती, मळे शिंपती, विळे चालती, विटा भाजती,
पाठीवरुनी पाट वाहती, कैक करवती कुरकुर करती,
मडकीं घडती, चिखल तुडवती, कोणी विणती, सारे कण्हती

या औतांतुन, हातोड्यांतुन  या जात्यांतुन, या पात्यांतुन
या दात्यांतुन, या भात्यांतुन  या कामांतुन, या घामांतुन
या अश्रूंतुन, या अग्नींतुन

—ठिणगी फुटेल जोसांत  येइल विजेच्या वेषांत
बिजली नाचेल गगनांत  वादळ होईल जोसांत

सं. नं.

# सत्तावनचे वीर

ते धन्य खरोखर सत्तावनचे वीर
जे स्वातंत्र्यास्तव झाले पूर्ण फकीर
झुंजार झुंजले, परि फिरलें तकदीर
          काल्पीस तयांचीं तुटून पडलीं माथीं
          झांशीस तयांचे मातिंत पडले साथी
खंबीर जाहली गनिमांची जंजीर १

बाहूंत जयांच्या नाचत होती बिजली
ती रणशय्येवर सेना अपुली निजली
ती ज्योत अखेरिस मोठी होउनि विझली
          परि चिरनिद्रेंतहि पडती स्वप्नें त्यांना
          कीं 'वंशज अमुचे देउनिया बलिदाना
हीं सुफलित करतिल बीजें येथें रुजलीं' २

रे शंभर वर्षें होतिल पुरतीं आतां
ती बेडी अजुनी पिचते आहे हातां
कां व्यर्थ तयांचीं स्तवनेंकवनें गातां ?
          तें दूरच आहे अजुनि किती मंदीर !
          अन् म्यानांतच तरि गंजति रे खंजीर !
ती अजुनी विजनीं झुरते आहे माता ३

# देशाची हांक

या ऽ गरिबानुं या झेंडा हातिं घ्या देशाची हांक तुम्हां हाय हो
सावकारशाही ठेवायची नाहीं ठेचायची आतां हाय हो धृ०

मोटार जांभळी भरवांत्र धांवली बसून भावली जाय हो
रानांतल्या वाटे तुडवून काटे रंकाचं फाटलं पाय हो

आला उन्हाळा पडद्यास्नी वाळा झळीचं नांव कुठं नाय हो
रंकाला मात्र बाभळीचं छत्र संगतीला कुत्रं हाय हो

हुक्क्यावर फुंकर घालायला नोकर थंडींत लोकर हाय हो
रंकाला मात्तर नेसायला लक्तर झोंपायला फत्तर हाय हो

चांदीच्या ताटांत जेवायचं थाटांत ·मिठाई पोटांत जाय हो
मातीचीं मडकीं जवार किडकी रंकाला सण कधीं नाय हो

बगीचा फुलला रंगानं खुलला वाऱ्यानं झुलला हाय हो
खडक फोडून जंगल तोडून कंबर मोडून जाय हो

एकीचा झेंडा पुकारी बंडा देशाची हांक तुम्हां हाय हो
अन्याव मिटवा जुलूम हटवा मोलाची घटका जाय हो

# सदैव सैनिका पुढेंच जायचें

सदैव सैनिका पुढेंच जायचें
न मागुती तुवां कधीं फिरायचें

सदा तुझ्यापुढें उभी असे निशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मधेंच या विजा भयाण हांसती
दहा दिशांतुनी तुफान व्हायचें
सदैव सैनिका पुढेंच जायचें

प्रलोभनें तुला न लोभ दाविती
न मोहबंधनें पदांस बांधिती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न मोह भासतो गजांत वैभवीं
न दैन्यही तुझें कधीं सरायचें
सदैव सैनिका पुढेंच जायचें

वसंत वा शरद् तुला न ती क्षिती
नभांत सूर्य वा असो निशापती !

विशीर्ण वस्त्र हो  विदीर्ण पावलें
तरी न पाय हे  कधीं विसावले !
न लोचनां तुवां  सुखें मिटायचें
सदैव सैनिका  पुढेंच जायचें

नभांत सैनिका  प्रभात येउं दे
खगांसवें जगा  सुखांत गाउं दे
फुलांफुलांवरी  सुवर्ण शोभुं दे
जगास शांतता  सुहास्य लाभुं दे
न पाय तोंवरी  तुझे ठरायचे
सदैव सैनिका  पुढेंच जायचें

# शतकानंतर

शतकानंतर आज पाहिली पहिली रम्य पहाट

मेघ वितळले, गगन निवळलें
क्षितिजावर नव रंग उसळले
प्रतिबिम्बित ते होउनि खुललें भारतभूमिललाट

आजवरींच्या अंधारांत
अनंत झाले उल्कापात
एकवटोनी तेज तयांचें तिमिर सरे घनदाट

फकिरांनीं शत यज्ञ मांडले
वेदीवरतीं रक्त सांडलें
त्या रक्ताची क्षितिजावर ये आरुण मंगल लाट

दीप पेटवुनि घरदारांचे
पूजन केलें स्वातंत्र्याचें
त्या ज्योतींचें तेज मिसळुनी झालें आज विराट

पुरेत अश्रू दुबळें क्रन्दन
भावपूर्ण करुं विनम्र वन्दन
नव अरुणाचे होऊं आम्ही प्रतिभाशाली भाट

# पहांटेचें स्वप्न

नेत्रां नित्रवित निद्रा आली
अवघीं दु:खें, अवघ्या चिन्ता
विस्मरणाच्या विशाल मोहक
पंखाखालीं लपून बसल्या
नैराश्याच्या ज्वाला थिजल्या
मजसह माझ्या आशा निजल्या
निद्रेच्या कलशांतच भरला
मी जीवनकलहाचा सागर

आणि पहांटे खिडकीमधुनी
चंद्रहि आला थकून भागुन
कलंडुनी माझ्याच उशीवर
तोही नकळत झोंपी गेला
क्षणभर जागृति आली–तोंवर
हळूच एकच झुळूक आली
आणि पुन्हां निद्रा–छे, आतां
निद्रा–जागृति संगम झाला

असल्या भलत्या वेळीं असते
अंधुक जाणिव अंधुक नेणिव
गर्भावस्था अशीच असते ?

कांहिं असो—त्या संगमकाळीं
गगनस्पर्शी भव्य मनोरम
स्वप्न पडे मज शतरंगांचें !
सार्थ स्वप्नें असलीं फिरुनी
पुन्हां न कोणी देखायाचे !!

सृष्टीच्या प्रारंभप्रभातीं
ब्रह्मयालाही स्वप्नें पडलीं
त्यांची अपुली सृष्टी घडली !
माझीं स्वप्नें—माझी सृष्टी
भांड्यामध्यें भांडें दुसरें !
कांहिं असो, त्या स्वप्नामध्यें
विश्वामित्राऐसें मीहि
सृजलें अपुलें विश्वच नूतन !

एकच होता राजा आणिक
एकच त्याला कन्या होती !
नांव तियेचें होतें 'शांती'
रूप रतीचें सुवर्णकांती
लग्न तिच्याशीं व्हावें म्हणुनी
जगांत अवघ्या स्पर्धा चाले
तिचें स्वयंवर होतें आतां
हर्षोत्साहित योद्धे झाले !

झालें ! आले कैक युयुत्सु
त्या वरदेचा कर धरण्यास्तव
स्वयंवराचा मंडप सजला
वर्णन त्याचें अशक्य वास्तव
चंद्रकलांच्या पणत्या शंभर
आणि कृत्तिका....बिलोर झुंबर
स्वर्गंगेतिल कमळें आणुनि
मंचक त्यांचे केले सुंदर

तो राजा—ती कन्या—अथवा
समूर्त जोडी सूर्यउषेची
आणि पुढें ते ग्रहगोलांसम
बसले होते स्वयंप्रकाशी !
....कालिदास, ये, इंदुमतीच्या
स्वयंवराचें वर्णन करुनी
सरावलेली तुझी शलाका
फिरव माझिया प्रतिभेवरुनी !....

त्या युवकांतच दिसली मजला
परिचित मुद्रा....होय तोच तो !
अवघ्या ऐश्वर्याचा ईश्वर
कैक कवींचा प्रतिभानिर्झर
साऱ्या सामर्थ्याचा सागर

एकमेव धर्माचें आगर
सुसंस्कृतीचें शिखर खरोखर
सत्याचें तर एकच तें घर !

डाव्या बाजुस हिमालयाची
कलती टोपी शुभ्र शोभली
गंगा यमुना सरस्वतींच्या
हारांनीं तर बहार केली
विंध्याऐशी अविंध्य छाती
आंत वाहती प्रीतीनिर्झर
सह्यगिरीच्या म्यानामधुनी
कृष्णेची तलवार निघे वर

धूसर निळसर वसनें लेवुनि
सागरिका त्या वारिति विंझण
सरस्वती त्या पुढती नाचे
शब्द खरोखर वाजति पैंजण
भालीं कस्तुरितिलक रेखुनी
चर्चुनि ठेवी चरणां चन्दन
माझा भारत दिसला त्याला
स्वप्नांतच मी केलें वन्दन

आणि तयाच्या अंवतीभंवतीं
असेच कोणी होते बसले

सिंहासम कुणि, कुणि व्याघ्रासम
जंबुकमुख तर अनेक दिसले !
नानादेशी नानावेषी
कशीं कळावीं नामें त्यांचीं
स्वप्नांतिल तें दृश्य—नव्हे ती
पोथी केवळ इतिहासाची !

मंगल घटिका आली—वाजे
मेघमृदंगावरती बोल
आणि म्हणाला राजा, "माझ्या
वेळेला तर फारच मोल....
अमोल माझी कन्या आहे
योग्य तियेला पती मिळावा
तिला रक्षुनी जग रक्षाया
समर्थ ऐसा युवा असावा"

नैसर्गिक अन् वळली दृष्टी
त्याची भारतवदनावरती
कैक जणांना पायाखालीं
दुभंग झाली वाटे धरती !
'शांती' हंसली—मूक संमती
दिसून आली तिच्या मुखावर

आणि तियेची सखी म्हणाली
"चला! जाहलें पूर्ण स्वयंवर!"

डाव्या बाजुस हिमालयाची
चंद्रकला कलली भालावर
गंगा-यमुना-सरस्वती हे
सर्पांचे जणुं हार मनोहर
बलशाली, तेजाची मूर्ती
प्रति-शंकर हा भारत! त्याला
वरिलें अमुच्या राजसुतेनें
कण्ठीं त्याच्या घालिल माला

भारत माझा उभा राहिला
अवघ्या ऐश्वर्याचा ईश्वर
कैक कवींचा प्रतिभानिर्झर
साऱ्या सामर्थ्याचा सागर
एकमेव धर्माचें आगर
सुसंस्कृतीचें शिखर खरोखर
सत्याचें तर एकच तें घर
दीनांचा आधार धुरंधर

तों गगनांतुन झाली वाणी
"राजा, फिरुनी पहा एकदां
पुन्हां एकदां निरखी त्याला

ज्याला देशी तुझी संपदा
फिरून फिरवी राजा दृष्टी
दिसला त्याला भारत माझा
...तेजाचें तें निधान केवळ
अवघ्या आनंदाचा राजा

विंध्याऐशी अविंध्य छाती
आंत वाहती प्रीतीनिर्झर
सह्याद्रीच्या म्यानामधुनी
कृष्णेची तलवार निघे वर....
हाय! काय हें! थबके राजा
भव्य असे जरि भारत मोठा
कुठें तयाचे बाहू दोन्ही
हा दोन्ही हातांनीं थोटा!

राजा वदला, " पंचनद्यांच्या
वाघनखांचा दक्षिण बाहू,
सोनसळी शेल्यांतिल सुंदर
सव्यहि बाहू कोठें पाहूं?
अमोल माझी कन्या आहे
योग्य तियेला पती मिळावा
तिला रक्षुनी जग रक्षाया
समर्थ ऐसा युवा असावा!"

निराश राजा, निराश ‘ शांती ’
दीर्घ तयांच्या निःश्वासानें
जागृति आली ! माझ्या नेत्रीं
प्रकाश भरला बालरवीनें
त्या स्वप्नांतुनि या स्वप्नामधिं
नियती मजला घेउनि आली
कुठल्या स्वप्नीं अर्थ असे तें
शोधक बुद्धी शोधत बसली

जाळत पोळत जागृति आली
अवघ्या चिंता अवघीं दुःखें
विस्मरणाच्या विशाल मोहक
पंखाखालुन उठून आलीं
नैराश्याच्या ज्वाला दाहक....
....छळूं लागल्या आशा नाहक
उठूनि आला कलशामधुनी
जणुं जीवनकलहाचा राक्षस

# महायान

सस्यशामल वंगभूमिला
नवीन शोभा नवी सजावट

हिरव्या हिरव्या शालूवरती
रक्तछटांची रम्य खुलावट

दुष्काळांतिल मृत जीवांना
नवीन आतां आले साथी

विभक्त देशासाठीं झाली
विभक्त देहापासुनि माथीं

बंगालांतिल संगीताला
आज लाभला नवीन रंग

अन्त्य भैरवी रंगविण्यातें
अनंत होती कंकणभंग

या द्वेषावृत कलहकलंकित
भूमीवरती येत कलंकी

सांधुनि कंकण, पुसून अश्रू
अनाथ अर्भक घेइल अंकीं

अर्धोन्मीलित नयनांमधुनी
स्नेहदयेची होइल वृष्टी
रक्तकलंकित तेथिल फिरुनी
होइल सस्यश्यामल सृष्टी

क्षीण पावलांखालीं तेथिल
कण्टक होतिल सुमनें सुन्दर
मन्द स्मित तें बघतां होतिल
समशेरींचे हार मनोहर

युगायुगांच्या पुण्याईच्या
पाथेयासह निघे तपस्वी
जीर्ण तनूच्या अश्वावरती
बलिष्ठ आत्मा निघे मनस्वी

एकाकी या पांथस्थासह
हृदयें जातिल चाळिस कोटी
ज्यांच्याविषयीं अगाध प्रीती
सांठविलेली त्या कृश पोटीं

एकलाच हा इकडे जमविल
समाजसंगीताचा मेळ
कौटिल्यांनों खुशाल तिकडे
राजनीतिचे खेळा खेळ.

# चालूं दे जयनाद

चालूं दे जयनाद ! मेघपटलें भेदून टाका नभीं
ऐकोनी बुजतील दिग्गज असा आतां झडो दुंदुभी
झाले दानव संगरांत विजयी ! चारी युगांची तृषा
झाली शांत; प्रकाश हा हरपला....आतां सुखाची निशा !

आतां यापुढती उठेल कुठुनी तो क्षीण शांत स्वर ?
पूर्वेला उगवेल काय फिरुनी शीतांशु तो भास्कर ?
आतां या, तुडवा खुशाल जगता, मानव्य जाळा चला
उन्मादें ध्वज रक्तलांछित धरा उंचावरी आपुला !

येऊं दे कलहास ऊत—अवघ्या झाल्या दिशा मोकळ्या
आतां आपुलिया करांत नुरली ती रेशमी शृंखळा !
आक्रोशें नच ऊर्ध्वबाहु कुणिही रोधील याच्यापुढें
द्वेषाचा जय जाहला—धडधडा रे वाजवा चौघडे ! !

आतां रौद्र विकारसिंधुलहरी माण्डोत रे ताण्डवा
तारूं हें खडकांवरी थडकवा किंवा तळीं घालवा....
कोणी यापुढती विचारकिरणें आम्हां इशारा न दे
दीपस्तंभ अम्ही पुरा बुडविला आहे समुद्रामधें

आतां शस्त्रमशाल दीप्त करुनी लावीत आगी चला
सारी मानवसंस्कृती धडकवा—थांबूं नका आजला !
नाहीं एकहि प्रत्यवाय उरला भेदावयातें अणू
स्फोटांच्याच सुरांत सूर मिळवूं—अन् हंसगीतें म्हणूं !

निर्मी ‘ धूलिमधून मानव ’ म्हणे—मोठाच हा विक्रम !
आम्ही मानवता धुळीस मिळवूं—थोडाच हा व्युत्क्रम ! !
तो गेला–उरलों अम्ही–सहज हो झाला पराभूत तो;
सूडाची जळतांच चूड विझला कीं शांतिचा दूत तो !

कामक्रोधहि जिंकिले ! परि तयें आम्हां कुठें जिंकिले ?
त्यानें मत्सर मारिला ! परी अम्ही मारून त्या टाकिलें ! !
तो सर्वज्ञ–परी तया कुटिलता ना आमुची ठाउकी !
मोठा बुद्ध असेल तो ! परि अम्ही निर्बुद्ध होतोंच कीं ! !

शांतीपूजक, सत्यदीपक तसा होता अहिंसाव्रती
प्रेमाचा नवधर्म तैं शिकविला—शत्रू नसे त्याप्रती....
आहे माहित....या कृतघ्नवर हो, या भाइ हो या पुढें
बोला रे जय आपुला नि बडवा उन्मत्त हे चौघडे ! !

# स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ?

ही गिरणी गाते यंत्रयुगाचें गाणें
खपतात हजारों येथें केविलवाणे
संसार उधळले, ऊर फाटले यांचे
हे स्थितप्रज्ञ परि विणती ताणेबाणे
पेरती थेंब हे निढळाच्या घामाचे
त्यांतून उगवतें धनिकांसाठीं नाणें
रेशमी विणावी साडी शंभर रोज
परि घरधनिणीचें नेसूं लाजिरवाणें
स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
धनवंत जगावे यास्तव यांनीं मरणें !

या दुःखी दुर्बळ बळिराजाला देखा
हा बळिराजा ?....छे....राजबळी या लेखा
हीं बैलं, औतं, जिमीन, गोठा, घरटं
कीं गहाणपत्रीं सोबत एकामेकां
भरघोस येउं दे पीक, पडो दुष्काळ
भाळावर याच्या संतत चिंतारेखा
सरकार सावकारांनीं अपुले भाग
घ्या आधीं, उरले मुखांत याच्या फेका

स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
हें गुलामगिरिचें दर्शन होत नसे कां ?

ह्या उभ्या झोंपड्या येथें साडेतीन
पसरलीं गाडगीं मडकीं तेजोहीन
दो हजार वर्षे हाच इथें देखावा
दारिद्र्य तयांना नाहीं आज नवीन
परळांत वाळले तुकडे दो दिवसांचे
ते पोरं खाती अश्रूंतच भिजवून
वाडगा भरोनी आई आणिल पाणी
गांवांत कुणाचे उंबरठे झिजवून
स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
जों महारवाडे हरेक गांवांतून

‘ हं चला पाहुणे, पाहूं अमुचा गांव
रेखीव तयाची रचना आहे राव....
ही हिंदू वस्ती स्पृश्यांचीच बरें का
राहतात केवळ उच्च कुळांतिल साव
अपवाद इराणी—तोही आर्यच आहे
त्या महारड्यांचें काढुं नका परि नांव
पलिकडे नदीच्या प्रशस्त त्यांना जागा
हो उगा कशाला त्यांना भलता भाव ? ’

स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
कुंपणापल्याडहि नाहीं अपुली धांव....

ह्या हिंदू वस्तित वळा जरासे खालीं
ही ब्राह्मण गल्ली पहा जरा भंवतालीं
ती शुभ्र इमारत दिसते ना त्या तिकडे
तें ब्राह्मणमंडळ....संघटना हो अपुली
त्या इमारतींतच चित्पावन संघाची
ती उजव्या बाजुस माडीवरची खोली
अध्यक्ष आपुले आपस्तंब बरें का
त्या ऋग्वेद्यांवर सरशी अपुली झाली
स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
रे कोनाड्यांतहि बिळें बिळांतच पडलीं

ही शाळा आहे श्वेतांबर जैनांची
ही मुख्य कचेरी सारस्वत संघाची
तें पाठारे प्रभु यांचें ग्रंथागार
ही केळवणी तर केवळ गुजराथ्यांची
हें भव्य मराठामंदिर इकडे देखा
ती चाळ तिमजली निव्वळ ओस्वालांची
हें राजस्थानी छात्रालय बाजूचें
ती क्रीडाशाळा सिंधांतील युवकांची

[library stamp]

स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
अंगांत प्रवृत्ती भिनली मंडूकांची....

हा पहा आमुचा सुंदर अबलख घोडा
मी खर्चहि यास्तव केला नाहीं थोडा
मोजून मोहरा दिल्यात अर्धा लाख
त्या नांव पित्याचें म्हटलें देउन सोडा
डर्बींत धांवला पठ्ठा...आला तिसरा....
जा प्रजेस सांगा हर्षुनि भोजन झोडा
आं! पिकलीं नाहिंत शेतें ?....धान्यच नाहीं ?
हे लबाड खेडुत हवा तयांना जोडा
स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
हे सिंहासनिंचे कोल्हे खालीं ओढा....

जोंवरी सुखाचा घास नसे सर्वांना
जोंवरी न झाल्या उन्नत अवघ्या माना
जोंवरी अभंग न झाला सर्व समाज
तोंवरी श्रमाविण अन्न मिळे धनिकांना
जोंवरी गुलामच राहिल अपुला देश
कोठून खरें स्वातंत्र्य अशा नादानां ?
जरि निघून गेले परके आपुल्या देशीं
आम्हीच आमुचे गुलाम हिंदुस्थाना !
स्वातंत्र्य ! कुठें स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ?
बेहोश जनांनों ! बंद कराच बहाणा....

# जल–उषा

दिशासतींनों चंद्रमुखींनों ! पुन्हां पुन्हां सांगा
सांगा पुनश्च अभिमानें
निळवंतीवर निशाण अमुचें नाचत जाईल
यापुढें डोलत डौलानें

अखेरच्या त्या चौलनृपाची अखेरची आशा
तरळते तरल सागरांत
सागरलक्ष्मी विजयनगरची विजनवासिनी वा
नाहते फिरूनि तेजांत
झामोरिनची बुडलेली वा दौलत उसळून
आली जलपृष्ठावरती
तुफान किंवा कान्होजीच्या शक्तिसागराची
ओहटी संपुन ये भरती
दिशासतींनों सूर्यमुखींनों पुन्हां पुन्हां सांगा
सांगा पुनश्च अभिमानें
पराक्रमाला पुन्हां मोकळ्या दहा दिशा झाल्या
कशाला पूर्वस्मृतिगानें

सागरिके ! ही पहिली वहिली विश्वासानें ग
टाकिली तुझिया पदरांत

सं. नं. ७७१०५ २२८९

सांग तुझ्या लहरी लहरींना ' सांभाळा जपुनी...
जोजवा हलक्या हातांत '
अथांग सुंदर दोन पाकळ्या निळया शिंपल्याच्या
आंत हा मौक्तिक आरक्त
सहस्रतारानयनीं म्हणुनी विश्वदेवतांनों
पहारा ठेवावा सक्त
दिशासतींनों चंद्रमुखींनों सूर्यमुखींनों ग !
जगाला सांगा अभिमानें
' वृथा कशाला खंत हवी ? ही संरक्षण अपुलें
करीलच अपुल्या तेजानें '

सागरतीरीं बलसागर हा नायक राष्ट्राचा
वन्दी महासागराला
उज्वल अपुल्या स्वप्नांमधुनी एका स्वप्नाचें
वाहतो दिव्य पुष्प त्याला
काय जगा संदेश सांगण्या तुवां सोडलें हें
कबूतर निळ्या सागरांत
तुझ्या कराच्या स्पर्शामधल्या सामर्थ्यावरती
निघालें कोठें वेगांत
चंद्रमुखींनों सूर्यमुखींनों दिशासुन्दरींनों !
जगाला सांगा अभिमानें

‘ पुण्यात्म्यांच्या पुण्याईचें चिलखत चढवून
पाहूं नवीं नवीं गगनें ’

अगे जलउषे ! उषा तूं जरी, अजून मागून
यायचे उदयाला भानू
अभंग फिरतां नौकायानें, इवल्या क्षितिजांच्या
कशाला मर्यादा मानूं ?
सह्याद्रीचा....हिमालयाचा अचलपणाचा तो
कशाला ऐकावा डौल ?
तरते दुर्गम दुर्ग होउनी बेलाशक हिंडा
मोकळा आहे भूगोल ?
चंद्रमुखींनों सूर्यमुखींनों दिशासुंदरींनों !
निक्षुनी सांगा अभिमानें
‘ आक्रमणाची ना आकांक्षा, स्वतंत्रता मात्र
तोलतों आम्ही प्राणानें

# गांधी मंदिर

उषा हासरी, वीज नाचरी,
पर्जन्याच्या सरींवर सरी,
मेघांचें डौलांत चालणें,
वाऱ्याचें बेताल वागणें,
संध्येची सौवर्ण शांतता,
आणि निशेची रम्य गूढता,
हें सृष्टीचें सुंदर विलसित
पाहुनि झालीं हृदयें हर्षित
आद्य कवींना स्फुरलीं गाणीं
ती वेदांची गभीर वाणी
त्या वेदांतुन
त्या गानांतून
भलतें चिंतुन
"वेदोनारायण" निर्मी नर
आणि आज गांधींचें मंदिर !

कर्मठतेचे पाढे वाचत
बसले होते मीमांसारत
मतामतांचा वाहे झंजा

सुरासुरांची चाले पूजा
त्यावेळीं कृष्णाची गीता
समन्वयाच्या दे नवनीता
‘ स्त्रिया-वैश्य-शूद्रांना देखिल
मोक्ष-द्वारें उघडीं होतिल’
गीतेच्याच विटेवर त्याला
उभा नरानें संतत केला !
तो गोवर्धन
तोच जनार्दन
हो कुचमर्दन !
गीत विरे, उरला मुरलीधर
आणि आज गांधींचें मंदिर

गणराज्याचा पहिला नायक
गणेशनामा सिद्धिविनायक
शाडूच्या गोळ्यांतुन त्याची
मूर्ति आपण निर्मायाची
आणि पुण्याच्या रस्यावरती
पोरेसोरें चेष्टा करती
टोपी अथवा हॅट घालुनी
चष्माहि कधीं लाविति नयनीं
कधीं दुचाकीवरून फिरतो

स्त्रियांसवें वा कोठें रमतो
मूषकपरिचर
विडंबितोदर
गजशुंडाधर
गणाधीश तो सकलविघ्नहर
आणि आज गांधींचें मंदिर

दानशूर कनवाळू नृपती
श्रियाळ आहे ख्यात भारतीं
पुत्रहि अपुला अतिथीसाठीं
पाठविला मरणाच्या भेटीं
पौर्वात्यांच्या आतिथ्याची
सुचवितसे तो सीमा साची
त्याची अतिथी-इच्छा-पूर्ती
विसरुनि गेलों, उरली मूर्ती
स्थापुनि आतां 'शिराळ शेटी'
मनुज विडंबन करितो हाटीं
हाय हाय ती
ग्राम्य जयंती
उरे काय ती
अतिथी येतां, भाळिं फुगे शिर
आणि आज गांधींचें मंदिर

वृक्षाच्या छायेंत बैसला
सत्यबोध अन् बुद्ध जाहला
सत्य निमालें, बोध विरमला
वृक्षचि पूजित मानव बसला
शाखा वृक्षहि पूजायाचें
बुद्ध म्हणे तें विसरायाचें !
बुद्धाचा बनविति डागोबा
नाकावरती परि रागोबा !
सत्य–अहिंसा यांची हिंसा
पशुतेची जगतांत प्रशंसा
मात्र गिरीवर
लेणीं सुंदर
मूर्ति मनोहर
सौंदर्यफुलें जणुं खडकांवर
आणि आज गांधींचें मंदिर

महंमदाचे सेवक गाजी
उठविति मशिदी दिल्लीमाजी
चुन्याप्रमाणें त्याचीं वचनें
चिणुनि चिऱ्यांचा इमला रचणें
खिस्ताचीं तर शहरोशहरीं
किती स्मारकें संगमरवरी

गोमंतकच्या चर्चांखालीं
कैकांचीं बलिदानें झालीं !
झरतुष्ट्राला करण्या वंदन
अग्यारींतुन जळतें चंदन
तत्त्वविनाशक
मृद्घटपूजक
केवळ वंचक
ज्योती फुंकुन दीप करी वर
अन् आतां गांधींचें मंदिर

शिवरायाच्या औदार्याला
विसरुनि गेलों, मात्र पुण्याला
रचलें आम्ही शिवाजिमंदिर !
आणिक पुतळा नव्या पुलावर !
तसाच तो टिळकांचा पुतळा
चौपाटीवर पाहि भूतळा
मात्र तयांच्या पगडीवरती
कोकीवरतीं काक बैसती
भवतालीं तर गजबज चाले
भेळपकोडी नारळवाले
स्थितप्रज्ञ तो
वीर शोभतो

आम्ही दिसतों
सच्चे वारस धीर वीरवर!
अन् आतां गांधींचें मंदिर

इसवि सनाची ही गुंडाळी
संपुन जाइल भविष्यकाळीं
कैक पिढ्यांचीं पानें उलटुन
समाज जाइल पार पालटुन
गांधीजींच्या उपदेशाची
स्मृती तयाला राहो साची
त्या हृदयाच्या उदारतेचें
अनुकरण तदा होवो साचें
मानवतेची करण्या पूजा
स्फूर्ती संतत लाभो मनुजा
पोपटपंची
पुराण वाची
अशी तयाची
स्थिती व्हावया असे नको जर
बांधुं नका गांधींचें मंदिर!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्र. ग्रंथ १२७०

# अमर विहंगम

आला त्या स्थळिं वीर मानधन तो आधार जो निर्धनां
तो वातावरणांत शांति भरली ऐकावया प्रार्थना
मूर्ती धीरगभीर, हास्यसुषमा साऱ्या जनां मोहवी
सायंकाळ असून हा परतला पूर्वेस किंवा रवी !
गर्दीतून मधेंच कोण घुसला ? डोळ्यांत लाली खुनी
झाडी पिस्तुल....आरपार घुसल्या गोळ्याहि छातींतुनी
आत्मा राहि घटांत–तो घट फुटे, मातींत जाअी पुन्हां
'बापुजी इहलोक जाति त्यजुनी' जाहीर झाले जनां
हा ! हा ! भारत हा विराट बुडला तत्काळ शोकार्णवीं
साऱ्यांचीं हृदयें विदीर्ण अवध्या होऊनि गेली भुवीं
अन्तीं शोकहि आवरून रचिती नेते चिता चन्दनी
गेले चन्दन चन्दनांत जळुनी गंभीर सायंतनीं

तो तात्काळ उठे चितेंतुनि अहा आत्मा विहंगापरी
'ये ये या घरट्यांत' कोटि हृदयें त्या बाहती अंतरीं !

# आईची वेदना

आज स्वातंत्र्यसोहळा माझ्या सुखाचा सोहळा
त्याचसाठीं रंगलेले नटवर झाले गोळा

माझ्या सौभाग्यलेण्यांनीं सारे स्वतःच नटले
वरी कौतुकें सांगती थाट आईचा आगळा

रक्तरंजित गुलाब दिला लालेलाल हातीं
आणि स्वतःच वानिती त्याच्या दिव्य परिमळा

ताऱ्यापरी तेजोमय माझ्या लेकरांचे आंसु
त्यांच्या सरींवर सरी मोतीहार माझ्या गळा

माझ्या अंगणांत झाला चंदनाचा विषवृक्ष
आणि माझ्या गगनांत ध्रुवतारा निखळला

आज गुलाब पाण्यानें शिंपलेले राजमार्ग
येथें कोमेजून जाती माझ्या आसवांच्या माळा

उत्सवाच्या उत्साहांत नगरांत रोषणाई
आणि माझ्या मंदिरांत पसरली अवकळा

नगरांत नगाऱ्याचा नाद अविरत चाले
त्यांत समजाव्या कशा माझ्या हृदयाच्या कळा

अहो राजप्रासादांत आहे आनंदी आनंद
माझ्या मनाचा गाभारा मात्र राहिला मोकळा

जरा स्नेह–चैतन्यांची पडूं द्यावी गळामिठी
पुनः चेतवा पेटवा विझलेला दीपकळा

# पूर्णाहुतीचा तो दिवस

ही एक हंसण्या-रडण्यापलीकडली गोष्ट आहे.

आम्ही पित्याच्या मरणानंतर धाय मोकलून रडलों.

आमच्या वेदनेचा उगम आमच्या लोभांत होता.

त्याच्या प्रकाशांत आमचे जरतारी पोषाख लखाखत होते.

त्याच्या सांवलींत आम्ही आमचीं दुकानें थाटलीं होतीं.

म्हणून तर त्याच्या प्रयाणानंतर आम्ही धाय मोकलून रडलों.

वेडा माळी........

अठ्याहत्तर वर्षें त्यानें बांबूच्या कामट्यांना पाणी घातलें !

सैरावैरा फेकलेलीं अमृताचीं बीजें एकजात बरड माळावर पडलीं.

त्यानें चौफेर काढलेले पाण्याचे पाट वाळवंटांत पसार झाले.

जगांत विषवृक्ष वाढत असतांना याचा अमृतवल्ली लावण्याचा अट्टाहास–

आतां त्याच्या प्रयाणानंतर जग पुन्हां एकसंध झालें ! सर्वत्र विषवृक्ष !

ज्या दिवशीं दीप विझला त्या दिवशीं माती मातीला मिळाली.

ज्योति ज्योतीला मिळाली, आम्ही मात्र तसेच कोरडे राहिलों.

आतां अंधरांतच किती गोड वाटतें नाहीं ?

चालूं दे—भयाण अंधारांतला उंदीरमांजरांचा खेळ चालूं दे.

आपण गंगायमुनांत त्याची राख कालवली

मानस सरोवरांत थोडी मिसळली, थोडी सात सागरांत.

ऋतुचक्राचे तीन फेरे झाले.
पाण्याची वाफ नि वाफेचें पाणी, काळपुरुषानें तीनदां किमया केली.
पण पाण्यांत पेरलेल्या राखेची फलश्रुति काय ?
वाटलें होतें कीं त्यांतून तेजाची बागशाही बहरेल.
समुद्राच्या फेसांतून वज्रांचे थवे निपजतील
पण आपली शेती हुकली आहे.
काळपुरुषानें अंतराळांत पेरलेल्या त्या तेजोबीजांतून
आतां पुढील युगांत तो पुन्हां प्रकटेल ?

आठवतें तुम्हांला ?
तीन वर्षांपूर्वी....प्रचंड शमीवृक्षाला काजव्यानें आग लावली.
अठ्याहत्तर वर्षें तापलेलें लाकूड क्षणार्धांत खाक झालें.
म्हणतात शमीमध्यें अग्नि निवसतो.
आपल्याकडे कांहीं त्याचा अंगारकण आला नाहीं.

त्याचा प्रवास कोठें चालला असेल ?
कोठें ना कोठें–दुरितांचें तिमिर तो घालवीत असेल ?
वठलेल्या वृक्षांना पालवीत असेल ?
फिरणें हा ज्योतींचा धर्म आहे, उगवती–मावळती–उगवती....

# विभूतिपूजक !

नवयुग उगवे क्षितिजावरती
उजळे अंबर उजळे धरती
अन् विश्वाच्या रंगभूमिवर
अवचित पुरुषोत्तम अवतरती

सुस्तपणानें रखडत रखडत
संसृतिचा रथ जग ने ओढत
महामनांच्या स्पर्शानें परि
घडघड रथ तो आक्रमितो पथ

मृत्युंजय ते ' सत्य ' पाहुनी
करिती जगभर घोष तयाचा
धिक्काराचा कोलाहल परि
बंद करीत तयांची वाचा.

परी कुणाच्या हृदयीं खोल
घुमती त्या सत्याचे बोल
शत शतकेंभर दुमदुमतां ते
जग म्हणतें—हें वच अनमोल.

जग म्हणतें—ते पूर्वज अपुले
अंधपणें या विभवा मुकले
आपण पूजूं प्रेमभरानें
त्याची मूर्ती, त्याचे पुतळे.

आणिक आणुनि भक्कम फत्तर
चबूतऱ्यावर उभविति मूर्ती
जयजयकार भिडे गगनाला
सत्यप्रेमा येते भरती.

चबूतरा परि घडतांघडतां
उरलेसुरले दगड वेंचुनी
त्या सत्याचा जिवंत वारस
मारुनि टाकति ठेंचुनि चेंचुनि !

# झाला थोडासा उशीर

किती रात्री जागलास
तेव्हां सारे झोंपलेले
झोपतां तूं – जागे झाले !

भांगेंतल्या तुळशीला
आम्ही तुच्छ मानियलें
वाळतां ती वानियलें !

आम्ही आषाढ टाळून
गेलों वसंतराज्यांत
आतां मनीं मेघ येत !

गॅसबत्त्यांच्या जगांत
आम्ही चंद्रा हिणविलें
मावळतां–उजाडलें !

व्यासपाणिनींच्या जगीं
ओशाळून गेला तुका
आतां आम्हां भक्तीभुका !

तुला पंडितसभेंत
केला कोनामधें उभा
आतां कीर्ती वेधी नभा !

ग्रं. नं. १४९२३

तुझ्या बटुमूर्तीमध्यें
कोंडलेल्या पांखरानें
सात व्यापलीं गगनें

तुझ्याकडे येतां येतां
आम्ही तमाशे पाहिले
तुझें दर्शन राहिलें

तुझ्याकडे येतां येतां
झाला वाटेंत उशीर
तोंच सुटला कीं तीर

# ही सत्त्वपरीक्षा

कां मध्यरात्रिच्या भीषण अंधारांत
प्रभु, तुम्ही उभे दारांत ?
ही सत्त्वपरीक्षा पहावयाची रीत
प्रभु, खरोखरी विपरीत

अंगावरतीं मेघावरणें
बिजलीचीं सौवर्ण भूषणें
प्रलयगर्जना हेंच बोलणें !
भय वृथा दावितां मला अशा रूपांत
मी जाणे तुमची प्रीत

मेघांतून वात्सल्य भरे तव
बिजली कसली ! हास्यच वास्तव
प्रलयगर्जनेंतहि गुंजारव
जरि फसवायाला मला तुम्ही सजलांत
प्रभु, तुम्ही पुरे फसलांत !
ही सत्त्वपरीक्षा पहावयाची रीत
प्रभु, खरोखरी विपरीत !

# डोळे दिपले

डोळे दिपले—अंधारी आली
प्रकाशझोत पाहून सारे
यक्षगृहांच्या वक्षावरून
लक्ष दीपांचे नक्षत्र—तारे
येऊन इथें नेवोत मला
वसंतांतले दक्षिण वारे
देउळामधें माउली कुणी
लावी समई—पाहूनि घ्या रे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

बाजार कसा झगमगतो
वस्त्रें जरीचीं, रुप्याचीं पात्रें
चित्रशाळा नी नाटक शाळा !
सरसावती अपुलीं शस्त्रें
जातो येथून—येथून जातो
बधिर झालीं अवघीं गात्रें
निळया तळयाच्या फळयावरतीं
आभाळांतलीं पाहीन चित्रें

गिरण भोंगे, मोटारपोंगे
घणघण घंटा गाडीची शीट

वे वे आण्यांच्या वस्तू विकती
वें वें करूनी लाचार धीट
रूळ रडती, कान किटती
कोलाहलाचा आला हो वीट
मन्द्रगंभीर अंगाईसाठीं
सागरतीरीं जाऊं दे नीट !

कोलाहलाचें गीत निर्माया
विनाकारण धडपडलों
ऐकून कोठें पोपटपंची
आविर्भावांत बडबडलों
निबिड वनीं वाट चुकल्या
मृगासारखा फशीं पडलों
तोडा हो पाश–सोडा हो मला
गजबजलों गडबडलों.

# दख्खनची राणी....

दख्खनराणीच्या बसून कुशींत
शेंकडों पिलें हीं चाललीं खुषींत
सुंदर मानव तुंदिल अंगाचे
गालींचे गुलाब शराबी रंगाचे
फेनिल मृदुल रेशमी वसनीं
ठेविल्या बाहुल्या बांधून बासनीं
गोजीरवाणीं लाजिरवाणीं
पोरटीं घेऊन पोटाशीं, कुशींत
दख्खनराणी ही चालली खुषींत

निसर्ग नटला बाहेर घाटांत
पर्वत गर्वांत ठाकले थाटांत
चाललें गिरीशमस्तकांवरून
आकाशगंगांचें नर्तन गायन
झेलून तयांचे नूपुर घुंगुर
डोलती डोळांत दूर्वांचे अंकुर
मोत्यांची जाळी घालून भाळीं
रानची चवेणी जाहली प्रफुल्ल
दख्खनराणीला नव्हती दखल !

‘ डयूकचें नाकाड ’ सरळ अजस्त्र
राहिलें उभें हें शतकें सहस्त्र
त्याच्याहि पाषाणहृदया कळाली
सृष्टीची शोभा ही वृष्टींत वेगळी !
पाहून वर्षेचा आनन्द–विलास
उल्हासें धांवत नाचते ‘ उल्हास ’
सौंदर्य पाहून अमृतें नाहून
बाभळी बोरींना रोमांच फुटले !
दख्खनराणीला कौतुक कुठलें ?

दख्खनराणीच्या कुशींत पोटांत
बुडाली जाणीव चहाच्या घोटांत
सोडती चिरूट धुराचे फवारे
न्याहाळी नजर रंगीत चेहरे !
रूजच्या रंगांत रंगलीं अंतरें
लटक्या हास्याचीं वाजतीं घुंगुरें
लाडीक बोल कृत्रिम फोल
मोहांत हृदयें गुंगलीं निवांत
दख्खनराणीच्या कुशींत पोटांत ।

बाहेर, भातांची हिरवी पिवळी
सोनेरी पोपटी माया ही आगळी

पांखरें पांढरी गिरकी घेऊन
रांगोळी काढिती मधून मधून
निळा तो तलाव–तांबूस खाडी ती
पांढरा प्रपात--हिरवी झाडी ती

डोंगराकडे पीत केवडे

अंवतीभंवती इंद्राचीं धनुष्यें
दख्खनराणींत मुर्दाड मनुष्यें

नटीच्या फोटोंत जवान मश्गुल
प्रेयसी करिते कानांत किल्बिल
किल्वर चौकट इस्पिक बदाम
फेंकीत फेंकीत जिंकीत छदाम!
नीरस पोकळ वादांचे मृदंग
वाजती उगाच खमंग सवंग

खोलून चंची पोपटपंची

करीत बसले बुद्धीचे सागर
दख्खनराणी ही ओलांडी डोंगर

धांवत्या बाजारीं एकच बालक
गवाक्षीं घालून बसलें मस्तक
म्हणालें, 'आई ग, धबधबा केवढा

पहा ही चवेणी, पहा हा केवडा
ढगांच्या वाफेच्या धूसर फेसांत
डोंगर नाहती पहा ना टेचांत '

म्हणाली आई, ' पुरे ग बाई !
काय या बेबीची चालली कट्कट
दख्खनराणीचा चालला फुंफाट

दख्खनराणीच्या पोटांत कुशींत
शेंकडो पिलें ही चाललीं खुषींत
मनानें खुरटीं, दिसाया मोठालीं
विसाव्या तिसाव्या वर्षींहि आंधळीं !
बाहेर असूं दे ऊन वा चांदणें
संतत धार वा धुक्याचें वेढणें

ऐल ते पैल शंभर मैल
एकच बोगदा मुंबई–पुण्यांत !
दख्खनराणी ही चालली वेगांत....

# हे रवीन्द्र !

हे रवीन्द्र ! कोठुनि आली जादूगिरी ?
कविराज ! लाभली कुठें कलाचातुरी ?

ही कविता....अथवा कातरता आर्तता
ही कविता....अथवा मृदुता सुकुमारता
ही कविता....अथवा मंगलता तत्त्वतां
ऋजु आर्त सुमङ्गल भाव....किती माधुरी

कधिं प्रशान्त सागर हेलावे वाटतें
कधिं श्रावणमासीं अभ्र जसें दाटतें
कधिं तुफान वारें सुटलें मोकाट तें
रे निसर्ग मुरला मूर्त तुझ्या अंतरीं !

—कां युवतिमनींची प्रीती भरली हृदीं ?
—कीं शिशुस्मिताची प्राशियली कौमुदी ?
—कीं उषा अवतरे हृदयीं कोमल पदीं ?
ही सहजचारुता तुझिया काव्यान्तरीं

—हें काव्य तुझें....वा नक्षत्रांची प्रभा
हें काव्य राहिलें अनुकारुनियां नभा

रे मूर्तिमन्त प्रभु राही त्यांतुनि उभा
तव काव्यब्रह्मा उपमा अपुरी पुरी

प्रतिविश्वामित्रा ! ( छे : तो तामस जरा )
हे कमलासन ! ( परि असुखी त्याची धरा )
तव कारुण्यांतहि आनंदाचा झरा !
प्रभुहून प्रभावी तूझी वागीश्वरी—

# माझ्या स्वप्नीं....

माझ्या स्वप्नीं दिसते मजला
सस्यश्यामल रम्य धरित्री
सदाकदा भरती दरियाला
सदाकदा पुनवेच्या रात्री

माझ्या स्वप्नीं...वनीं उपवनीं
बारा महिने वसंत फुलतो
प्राजक्ताच्या पायघड्यांवर
मदन सदा हळुवार चालतो !

माझ्या स्वप्नीं....शांत सरोवर
नौका, वीणा अन् मृगनैना
तारे....वारे....इंद्रधनुष्यें
आकाशीं हरिणाचा ऐना

स्वप्नांतुनि परि जागृति येतां
विस्कटलेली भग्न धरित्री
गढूळ जीवन घामट कोमट,
भर दिवसा अंधेऱ्या रात्रीं !

रणरण, वणवण, घणघण घंटा....
कोलाहल....कलहाचा वारा
क्षुधा, तृषा, अतृप्त वासना
फुलांत विष, अन् जळीं निखारा !

प्रजापतीपरि इच्छा होते
कीं मत्स्वप्न असें पसरो कीं
विकट सत्य अदृश्य होउनी
स्वप्नचि फक्त उरूं दे बाकी !

स. न.

# दिवाळी

नगरांतिल सदनांतुनि
लखलखती लाख दिवे
क्षणभर कीं स्थिर झाले
उल्कांचे दिव्य थवे !

बघ धरती, बघ वरती
तेजःकण थरथरती
पुरुषार्थी मनुजानें
निर्मियलें गगन नवें !

व्यर्थ तुझा यत्न नरा
जग ऐसें उजळाया
मिणमिणत्या शत पणत्या....
जातिल पण त्या वांया

भंवतीच्या तिमिरास्तव
उपचार न हा वास्तव
अंतरिंची ज्योत जरा
उजळ जगा जगवाया !

कोणाच्या हृदयांतुनि
प्रेमाची ज्योत जळे ?
द्वेषाच्या वणव्यांतच

मानवता होरपळे
हे येशू ! हे बुद्धा !
पाहुनियां या युद्धां
शांतीच्या वेदांचें
वैफल्य न काय कळे ?

देखाव्या दाहि दिशा
दुःखांचा नाद उठे
जळति जरी दीपशतें
तेजाचें नांव कुठें ?
अशुभा ही शुभरजनी !
जागृति ना अजुनि जनीं
युद्धाच्या अंतांतुनि
युद्धाचें बीज फुटे !

आनंद नि सौख्याचीं
गाऊं कशीं नवकवनें ?
आक्रंदति, आक्रोशति
शोकानें भुवि भुवनें !
प्रेमाविण विश्व झुरे
शांतीचें नांव नुरे
तोंवरि हे मंगल दिन
जातिल–जावोत सुने !

# अमर आशा

आशा, अमर आशा, अमर आशा
'अथांग सागरिं तुफान होतां
जललहरी या नभास भिडतां
नाविक हो ! तुम्हि का धडपडतां ?
कुठें किनारा ?
कुठें निवारा ?'
'आशा, अमर आशा, अमर आशा'
'युगानुयुग हरि फसवित सकलां
सुखकण क्षणभर कुणा न दिसला
भाविक हो ! तरि भाव न सुकला ?
कुठें सुदर्शन ?
हरि अघमर्षण ?'
'आशा, अमर आशा, अमर आशा'
'अश्व बिथरले, गजकुल फिरलें'
भग्न रथीं सारथी पहुडले
नायक हो ! तरि तुम्ही एकले
कशास लढतां ?
वृथा झगडतां ?'
'आशा, अमर आशा, अमर आशा'

# सोनापुरच्या भिंतीवरती

सोनापुरच्या भिंतीवरती
सृष्टि रुपेरी करते झगमग
स्वप्नांच्या या माला लहरत
कुजबुज करिती सुंदर हें जग

तरल तरंगासम वसनांतुन
तरळत उठती वर्तुळ रेषा
सोनापुरच्या भिंतीवरती
मदनाची सांकेतिक भाषा

रंगसंगतीविसंगतींतुन
अर्धप्रस्फुट विलसे यौवन
सोनापुरच्या भिंतीवरती
नकली दौलत खिळवित लोचन

खळी गुलाबी गालावरची
ओतत राही कोठें मदिरा
निम्नोन्नत उच्छृंखल आकृति
सांवरतांना ढळवित पदरा

कामक्रीडा गोपसख्यांची
खय्यामाची रम्य रुबाई
रंगेलांची प्रणययाचना
दावित रोज नवी नवलाई

नामा तुकया जयदेवासह
पंगत करुनी शब्‌नम्‌ बसली
एस्थेरचि अन्‌ अंगोपांगें
प्रभुरामाच्या निकट विलसलीं

नाचत नाचत भुंवया उडवित
परस्परांचे गुंफुनियां कर
फेर धरति सोनापुरभंवती
या लीलारति या चिरसुंदर

मरणाची झांकाया धास्ती
मानवतेची धडपड कां ही ?
काय वेदनाविश्वावर नर
पटल धुक्याचें ओढुन घेई ?

सोनापुरच्या भिंतीमागें
राख घालितो माथां लिंब
रात्ररात्रभर रडुनी रडुनी
रानफुलें तर ओलींचिंब

कपालकुंडल घालुनि मिरवे
खुरट्या तृणपात्यांची सेना
बाळपणांतच करपुनि गेल्या
दूर्वांच्या मृदु रम्य भावना

कुठें कुणाच्या संसाराची
अंकुरणारी आशा जळते
कुठें कुणाच्या पोशिंद्याचें
अग्निरथांतुन प्रयाण होतें

रुद्ररूप जणुं सत्यावरती
माया घालित आवरणाला
मानवमनिंची ही विजिगीषा
झांकुनि जिंकुं बघे मरणाला

ओढुनताणुन आणी येथें
दुबळा मानव चंद्रबळाला
मरणाच्या दारांतहि मानव
अनंगरंगीं रंगुनि गेला

विकट सत्य झांकायासाठीं
सोनापुरचा उभा असे तट
बोलति तेथिल अवघ्या आकृति
जय जीवनपट जय शाश्वतनट

# केवळ सौन्दर्य केवळ आनंद

केवळ सौन्दर्य केवळ आनंद

सागरनभाचें बिंबप्रतिबिंब
माळावर संध्यारंगाचे तरंग
अंवसेच्या घरीं नित्याची दिवाळी
सूर्यांत जळती ताऱ्यांचे पतंग
सोनेरी शेतांत राघूंची भरारी
प्रश्नचिन्हांपरी पर्वत अभंग
कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

निसर्गानें दिला आनंदकंद
केवळ सौन्दर्य केवळ आनंद !

छदीफंदी झरे गातात तराणे
प्रेमी पवनाचें फिर्यादीचें गाणें
रानपांखरांची एकमेकां साद
चन्द्रिकेंत मंद्र सागराचा नाद
कडाडून वीज कापते अंधारा
गूज धरतीशीं करी वर्षाधारा

कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

निसर्गाचे नवे अनुष्टुभ् छंद
केवळ सौन्दर्य केवळ आनंद

निशिगंधावर सुगन्धाचे पेले
प्राजक्त झेलीतो चमेलीचे झेले
नागांनाही मोही असा सोनचांफा
ओलेत्या पृथ्वीच्या नऱ्हाळीच्या वाफा
तान्ह्या मस्तकाचा मस्त ताजा गंध
आंबेवनामधें वसंत ये धुंद
कशाचा बोध ?
तात्पर्य शोध ?

बांधून टाकिती सौरभबंध
केवळ सौन्दर्य केवळ आनंद

तप्त भाळावर माउलीचा हात
ग्रीष्मांतील रात्रीं मन्दमन्द वात
ओल्या पुलिनाच्या पावलांशीं गोष्टी
षोडषवर्षेचे ओष्ठ निज ओष्ठीं
थंडीनें फुटल्या कपोलांचा स्पर्श

निर्भरालिंगनीं अनिर्बन्ध हर्ष
कशाचा बोध ?
तात्पर्य शोध ?

पुरे नाहीं कां हा हर्ष अनिर्बंध
केवळ सौन्दर्य केवळ आनन्द

गोड तुरट तें शहाळ्यांचें जळ
गोड कडवट मद्य रतिफळ
गोड आंबटशा चिंचेची ती मिठी
ताज्या जांभळाची चव खट्टीमिठी
गोडी अवीट ती दीर्घ चुंबनाची
किंवा ओझरत्या बालकपोलांची
कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

लुटा रे लुटा हा मधुमकरन्द
केवळ सौंदर्य केवळ आनंद

पांच नद्यांतून मनःसागरांत
आनंदजळाचे पूर भरतात
पंचरंगांच्या या इंद्रधनुष्यांत
चित्तचंडोल हो भरारी घेतात

पांच राजहंस माझ्या पालखीला
उचलती उंच आनंदमयांत

कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?

जय शब्द स्पर्श रस रूप गन्ध
केवळ सौंदर्य केवळ आनंद

# वादळवाऱ्यापरी

वादळवाऱ्यापरी सखे, तो आला माझ्या घरीं
खुशाल दारें उघडुनि आला माझ्या हृदयांतरीं !

निष्ठुर करणी खरी--तयाची रीत कशी बघ तरी
खुशाल येउनि सूर छेडिले माझ्या वीणेवरी !

बळजोरी कां बरी अशी ही सांग सखे सत्वरी ?
खुशाल माझ्या चित्रांमधुनी रंग आपुले भरी !

अंदाधुंदी पुरी असे ग त्याच्या राज्यांतरीं
खुशाल माझ्या स्वप्नांमधुनी स्वारि उभी हांसरी !

उद्यानाभीतरीं--मांडितो तांडव वरचे वरी,
जाइजुईच्या प्राजक्ताच्या पडति सरींवर सरी !

गुंफिल हातच करीं--कधीं तो फिरविल अंगुलि शिरीं
श्वासानें वा माझ्या हृदयीं वाजवितो बांसरी !

खळ छळतो यापरी--असे कां हृदय तयाला तरी ?
तेंच पाहुं कां मस्तक ठेवुनि त्याच्या वक्षावरी ?

# फिरली मर्जी

फिरली मर्जी ? येउं नको तर फिरून अमुच्या घरीं
इथें कुणाला पर्वा आहे आला नाहिंस तरी !

रात्ररात्र जागेन एकटी फिरत पिशाचापरी
नसो तुझें स्मित–हंसतिल तारे फुलतां मधुशर्वरी

पुष्पसुगंधित अंगुलि फिरविल वारा माझ्या शिरीं
समजुं नको कीं तुझ्याच स्पर्शीं आहे जादूगिरी

दिसेल मजला आकाशाचा गूढ नीलिमा वरी
इथें कुणाला नेत्रांची तव पर्वा आहे तरी !

प्राजक्ताशीं ओठंगुन उभि राहिन मी क्षणभरी
अवचित पुष्पें पडतिल गालीं तुझ्या चुंबनापरी

कोसळून अन् आषाढाच्या पडतिल जेव्हां सरी
सोंसाटत धांवेल नदी ही गुंफागुंफांतरीं !
झुंजत झुंजत झेलुनि घेइन लाटा वक्षावरी
तुझ्या मिठीच्या आवेगाची नाहीं मातब्बरी

फिरली मर्जी ? येउं नको तर फिरून अमुच्या घरीं
इथें कुणाला पर्वा आहे आला नाहिंस तरी !

# नकळत तुमचे डोळे वळले

नकळत तुमचे डोळे वळले जिच्याकडे रस्त्यांत
हाय तिचा मी बळी घेतला अवखळ तारुण्यांत
तिच्या स्मिताची ज्योत्स्ना अजुनी आहे तैशी आहे
भृकुटीखालीं व्याधद्वय तर अधिकच चमकत राहे
अजून अपुलें अंतर जाई गुंतुन कुन्तलपाशीं
ती मदिरा—ती जादू—विष तें अजुन मोहनेपाशीं
वरवरची ही ऐट तिची—हें सोंग नाटकी पुरतें
अजुन मला ती स्मरते स्मरते....अजून झुरते झुरते !

सोळा सतरा वसंत झाले तिच्या वयाला जेव्हां
वैभव अभिनव असें फुले कीं वसंत करितो हेवा !
निळ्या निळ्या वसनांचीं अभ्रें अंगावरति असून
तारुण्याची तिच्या झळाळी उसळे बंड करून
पदन्यास अन्यास कधींहि तिचा न साधायाचा
यौवनमत्त असूनहि हल्लक झुलता फुलता साचा
अशा पदक्षेपांत एकदां हृदय गवसलें माझें
आणि तिच्या संमतिचें त्यावर आरुण तेज विराजे

येरझार नेत्रांची नंतर कितीकदां तरि झाली
कितीक संभाषणें निरर्थक, उगाच हंसुनी गालीं

शोधुन शोधुन कितीक कामें परस्परांचीं केलीं
आणि आर्त चित्तांत भावना अनभिज्ञात उदेली
आणि एकदां–नदीकिनारीं, जंव अंवसेची रात
दिव्य पौर्णिमा झळकुन गेली अमुच्या आयुष्यांत
तारुण्याची ज्योत मिळाली तारुण्यज्योतींत
मूकपणानें गाउन गेलों अद्भुत जीवनगीत

सगेसोयरे सांगति तेव्हां व्यवहाराची रीत
कोणि म्हणाले ‘ परत मागुती ! प्रीत असे विपरीत....
तूं तर नुकते पंख पसरले गगनें व्यापायाला
सोनेरी बेडींत उगा कां गुंतविसी पायांला
प्रज्ञा तव, तव विद्या, ध्येयें, आकांक्षाहि विशाल.......
ही नटवी सटवी तुज भुलवी–झुगार तिजसि खुशाल ’
आणि अखेरिस फसलों मी अन् मुकलों या बिजलीला
विद्याधन मी संचित केलें, विकलें धन मिळण्याला !

आज एक अश्राप मुलीचा पति मी संसारांत
गोजिरवाणीं दोन पांखरें खेळतिही दारांत
कुणाकुणाला जाणिव नाहीं—नसो कधीं जाणीव
कीं या भरल्या संसारीं मज वाटे अजुनि उणीव
मनामधें मी करपुनि गेलों—झाले केश रुपेरी
सळसळत्या नव तारुण्याची गेली आज उभारी

मी चुकलों, मी मुकलों तिजला; थकलोंही मी पुरता
भरल्या संसारांत स्मृति ती छळते मजला आतां !

तिची मान अभिमानभरानें अजून उन्नत राहे
तिच्या स्मिताची ज्योत्स्ना अजुनी आहे तैशी आहे
अजून अपुलें अंतर जाई गुंतुन कुंतलपाशीं
ती मदिरा—ती जादू—विष तें अजुन मोहनेपाशीं
सुखसंसारीं रडतों मी, ती हंसते शून्यमहालीं
अजुनि मुक्त उन्मत्तपणें ती छळते सांजसकाळीं
नकळत तुमचे डोळे वळती तिच्याकडे रस्त्यांत
आणि रोज मी बळी जातसे माझ्या प्रौढ वयांत !

# तिची ही कहाणी

रानांत कोनांत
पडक्या कुव्यांत
शेवाळल्या जळीं
कमळाची कळी
उमलली कोणी
तिची ही कहाणी

तिच्या जन्मकाळीं
रात्र होती काळी
वडाच्या ढोलींत
कोणी दिवाभीत
होता घुमवीत
नैराश्याचीं गाणीं

तिच्या शैशवांत
निळ्या आभाळांत
ढग आले गेले
जीव मुके मेले
आणि सडलेलें
बुरसलें पाणी

तिच्या सभोंवतीं
होल्या घायपाती
वारुळाच्या मुखीं
दीस डुबला कीं
साप कांत टाकी
लख्ख रुप्यावाणी

तिच्या घरापाशीं
कधीं मधमाशी
नाहीं फिरकली
नाहीं डोकावली
घाणेरीच्या कळ्या
तिच्या सोबतिणी

तिच्या बालपणीं
थरारलें पाणी
फक्त एकदांच
वारा करी नाच
आणि पाचोळ्याची
उरीं पडे गोणी !

तिच्या यौवनांत
बाभुळवनांत

बोरींच्या हातांत
बाभुळीचे हात
भरदिसां प्रीत
उघड्या मैदानीं

—आणि अवचित
जीवनप्रभात
तिची उजाडली—
उमले पाकळी
सौंदर्याची खाणी
सुगंधाची राणी—

शेवाळाची शाल
घेउनी खुशाल
बाप घरीं घोरे
पोर मनीं झुरे
मखमल मनीं
खुपे कांट्यावाणी

अंवशीं पहांटे
उरीं दुःख दाटे
मनांतलें स्वप्न
मनांतच आटे

आणि रात्रंदिस
डोळ्यामधें पाणी !

नाहीं म्हणायला
विहिरीकांठाला
धोतऱ्याचें फूल
बघे घालूं भूल
असह्य जीवन
अधिकच आणि !

कमळकळीची
आस जगायाची
विरे हळूंहळूं
रडे मुळूमुळूं
तिला लागे कळूं
मुक्तता मरणीं !

परी भोग तिचा
नसे लेचापेचा
मरण येअीना
जीवन भेटेना
तिच्या नशिबांत
अखंड झुरणी

पिंपळाच्या मुळ्या
घाणेरीच्या कळ्या
धोतऱ्याचीं फुलें....
—जीव तिचा उले
परी स्थिरावलें
समाधींत पाणी !

अजून रानांत
पडक्या कुऱ्यांत
शेवाळल्या जळीं
आहे तीच कळी
असतील तिच्या
जगांत बहिणी
त्यांची ही कहाणी ! !

# फकिराची फिर्याद

कषायवस्त्र असे सदा तनूवरती
जनास टाळुनियां वनामधें वसती
कमण्डलूविण या करी न संग्रह मी
पुनःपुन्हां शिकवी मनास संयम मी
विराग अंतरिंचा तरीहि ढांसळला
बघे अचानक मी नदीवरी तुजला

कटीवरी घट तो घटांवरी झुलता
सलील अंचल अन् समूर्त चंचलता
कमण्डलूहून या उजू कमंडलु ते
तशांत नागिण ती तयांवरी डुलते
असो असेल तुझी तशी स्खलन्त गती
मनांत अग्निफुलें मदीय कां फुलती ?

भरून घेउनियां कटीवरी कळशी
उगाच ठुम्कत तूं घराकडे वळशी
तुलाच न्याहळती खट्याळ नेत्र सये
कितीहि आंवरले-तरी अनावर हे
विराग–मंदिर हें क्षणांत कोसळलें
तुला न हक्क तसा....तुला न तें कळलें !

तिथेंच कां न्हती अमाप सुन्दरता
प्रवाह झुळ्झुळता तिथेंच कां न्हता?
सुवर्णकळसाचें तिथेंच मंदिर ते
तिथेंच वेळुवनीं तुरे भुरे न्हते?
मिटून लोचन मी किती तरी धरले
स्वरूप लोचनिं या तरी तुझें भरलें

शिवाहुनि शिव मी! अनंग जाळियला
मनांत आजवरी गमे उगा मजला
परंतु टाकुनियां अशा कटाक्षशरां
कशास जागविलें फिरून पञ्चशरा!
तुला न हक्क तसा—तुला न तें कळलें
म्हणून काय तुवां पुनःपुन्हां छळलें

निलाजरी पुरती—निघून जा म्हटलें
तरीहि पाउल तूं मनांत रोंवियलें
जुलूम हा असला कुणास सांगु तुझा?
करून घे सखये तुझी तुलाच सजा!
इथून जन्मभरी अशीच राहि इथें
करीन बद्ध तुला करांत मी दयिते

नों. न. ...

# झेलमचे अश्रू

सुंदर किति गिरिकन्दर हिमराजाचे
सृष्टिसतीच्या घरचे कलश रुप्याचे
भरलें त्यांतुन निर्मळ शीतळ पाणी
देवबिन्दू हे संचित नन्दनवनिचें १

माया रविची येतां कधिं सौवर्ण
हिमालयाचा होई दिव्य सुपर्ण
विशाल अपुल्या पंखांच्या छायेंत
रक्षित जणुं तो अमृतघटां परिपूर्ण ! २

उदार झाले परी एकदां देव
कृपणाऐशी नको म्हणाले ठेव
सुधा मिळूं दे अपुल्या सत्पुत्रांना
हृदयामध्यें उदया ये हा भाव ३

आणि म्हणाले पाहुनि अंवतीभंवती,
"तिलोत्तमे ! ये; येइं मेनके ! पुढती
चल उर्वशी, अलंबुषे ! चल रम्भे !
अमृतकुंभ हे घ्या कटिखांद्यांवरती ४

फुलवाया नवजीवन धरणीवरती
उभवाया नववैभवशाली धरती
जगवायाला जगांत मानवजाती
जा उधळा ही दौलत तुमच्या हातीं ५

रूपें नामें दुसरीं आतां घ्यावीं
सिंधू--सतलज--चिनाब--झेलम--रावी !
देवांना प्रिय भारतभूचे पुत्र
संजीवनि ही सदा तयांना द्यावी ! ” ६

देवेन्द्राची आज्ञा वन्द्य तयांना
लगबग उठुनी झाल्या सज्ज प्रयाणा
'मानस-सर' हा विशाल दर्पण त्यांचा
त्यांत पाहती त्या वेळावुनि माना ! ७

अशा निघाल्या ठुमकत मुरकत नारी
हिमालयाची कायम थिजली स्वारी !
अवघ्या अवखळ खळखळ खेळत जातां
हंसती कंदर, खुदखुदतात कपारी ८

मार्गामध्यें माळति सुमनें कोणी
नादामध्यें गुणगुणती वा गाणीं

होत्या सिंधू–चिनाब–सतलज–रावी;
झेलम भासे परि सर्वांची राणी ! ९

मार्गामध्यें दुर्गम दुर्गमहर्षी
सहर्ष त्यांना खुशाल झेलम स्पर्शी !
स्वभाव कैसा जाइल मूळ तियेचा
विश्वामित्रा पूर्वीं ती आकर्षी ! १०

चालावें किति झेलमनें डौलांत
नाचावें किति लहरींच्या तालांत
तिनें हंसावें कमळांच्या नयनांनीं
अन् बोलावें पक्ष्यांच्या बोलांत ! ११

अपुल्या गंधें कस्तुरिमृग हो धुंद
वेडावुनि तो फिरतो गरगर अंध !
बाहुंत त्याला झेलम झेलुनि घेई
आवर्तांतुन भरतो कस्तुरिगंध ! १२

सर्वच असुनी हिमवंताच्या पोरी
झेलम् होती त्यांतहि निस्तुल गोरी
नटण्याची परि पुरवायातें हौस
काश्मिर देशीं केली केशर–चोरी !! १३

कधीं प्रपातांतुनि झोंकुनि दे अंग
कडे दुतर्फा करी उभे उत्तुंग
कधीं कधीं ती मुग्धेपरि हो स्तब्ध
तारुण्याचे कधीं करावे रंग ! १४

श्रीनगराची श्री झेलमवर लुब्ध
जहांगिराची गिरा जहाली मुग्ध
आणि म्हणाला अकबर, ' या झेलमच्या
वक्षावरि बरि कबर मला विश्रब्ध ! ' १५

न तो हिमालय–गोकुळ तें दुसरें हो !–
घटाघटांतुनि दुग्ध जयांत भरे हो !
न त्या नद्या–त्या गौळणि हरिच्या साऱ्या
मधेंच झेलम राधेपरि विचरे हो ! १६

आली देखा, झेलम गौळण आली
कटि-खांद्यावर घट होती वर खालीं
निळसर शालू सोनसळी कांठांचा
लेउनि आली गौळण ही मतवाली १७

जाइल तिकडे तृषार्त झाले शांत
आणि भुकेले थांबविती आकांत

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं. ..........

शिंपित शिंपित संजीवन जातांही
' शान्तिस्तुष्टिः पुष्टिः ' पंजाबांत १८

ती ही झेलम–पंजाबाची राणी
ती ही झेलम–सौंदर्याची खाणी
कामदुहा ती दूती देवेन्द्राची
दिसते देखा आतां केविलवाणी १९

युगानुयुग ही होती तैशी होती
ऋग्वेदांतिल हिनें ऐकल्या गीती
धम्मपदांतील वचनें येती पाठ !
अशोक होता दावित इजवर प्रीति २०

उतरे तीरीं शिकंदराची सेना
हिनें पाहिली शकहूणांची दैना
हिच्या घटांतील दुग्ध पिऊनी मात्र
संस्कृति लाभे अवघ्या संस्कृतिहीनां ! २१

या झेलमचें एकच शाश्वत गीत
" करा करा रे परस्परांवर प्रीत
धर्मांच्या वा वंशांच्या अभिमानें
झगडायाची रीत किती विपरीत ! २२

" शीख असूं दे, असुं दे मुस्लिम-हिंदू
एकच आहे मानव्याचा सिंधू !
....या सिंधूस्तव आहे जीवन माझें
एकवटा रे ! जैसे बिन्दुंत बिन्दू ! " २३

आणि खरोखर झेलमच्या हृदयाला
भिन्नत्वाचा स्पर्शहि नाहीं झाला
कुणी असूं दे भारतभूचा पुत्र
देवेन्द्राची आज्ञा वन्द्य तियेला २४

कुणी असावी दोन जुळ्यांची आई
दोघांनाही दूध पिण्याची घाई...
माउलिच्या मग मायेनें दोघांना
घेउनि अंकीं स्तन्य जशी ती देई २५

तैशी देखा—आली झेलम् आली
कटि-खांद्यावर घट होती वर खालीं
हिन्दकळोनि दूध अहो ! ओसंडे
दो तीरांवर पुष्टिस्तुष्टी झाली ! २६

ती ही झेलम्–औदार्याची मूर्ती
ती ही झेलम्–ऋग्वेदाची स्फूर्ती

दिसते देखा आतां केविलवाणी
कामदुहा ती देवेन्द्राची दूती २७

किती लढाया झाल्या हो तिजपुढती
चेंगिझ–नादिर अनेक येती जाती
आज मला परि दिसते झेलम जैशी
उदास, तैशी कधींच दिसली नव्हती २८

तीरांवरती सैन्यें लढलीं, मेलीं
परस्परांची हानी भलती झाली !
शांत अशा परि साध्या नागरिकांची
अशीं न फिरलीं माथीं कुठल्या कालीं २९

आज ! अरेरे ! झेलम हो शरमिंदी
तिच्या तरंगीं रक्त मिळे जास्तंदी !
या झेलमच्या स्तन्यावर जे पुष्ट
त्या पुत्रांतच व्हावी अंदाधुंदी ! ! ३०

थंडपणानें भाऊ मारिति भावां
दोस्ती दावुनि साधुनि देती दावा !
अन् आईच्या उघड्या डोळ्यांपुढतीं
त्या पुत्रानें याचा प्राणच घ्यावा ! ३१

" शीख असूं दे, असुं दे मुस्लिम-हिंदू
एकच आहे मानव्याचा सिंधू !
....या सिंधूस्तव आहे जीवन माझें
एकवटा रे ! जैसे बिन्दुंत बिन्दू ! " २३

आणि खरोखर झेलमच्या हृदयाला
भिन्नत्वाचा स्पर्शहि नाहीं झाला
कुणी असूं दे भारतभूचा पुत्र
देवेन्द्राची आज्ञा वन्द्य तियेला २४

कुणी असावी दोन जुळ्यांची आई
दोघांनाही दूध पिण्याची घाई...
माउलिच्या मग मायेनें दोघांना
घेउनि अंकीं स्तन्य जशी ती देई २५

तैशी देखा—आली झेलम् आली
कटि-खांद्यावर घट होती वर खालीं
हिन्दकळोनि दूध अहो ! ओसंडे
दो तीरांवर पुष्टिस्तुष्टी झाली ! २६

ती ही झेलम्–औदार्याची मूर्ती
ती ही झेलम्–ऋग्वेदाची स्फूर्ती

दिसते देखा आतां केविलवाणी
कामदुहा ती देवेन्द्राची दूती २७

किती लढाया झाल्या हो तिजपुढती
चेंगिझ–नादिर अनेक येती जाती
आज मला परि दिसते झेलम जैशी
उदास, तैशी कधींच दिसली नव्हती २८

तीरांवरती सैन्यें लढलीं, मेलीं
परस्परांची हानी भलती झाली !
शांत अशा परि साध्या नागरिकांची
अशीं न फिरलीं माथीं कुठल्या कालीं २९

आज ! अरेरे ! झेलम हो शरमिंदी
तिच्या तरंगीं रक्त मिळे जास्तंदी !
या झेलमच्या स्तन्यावर जे पुष्ट
त्या पुत्रांतच व्हावी अंदाधुंदी ! ! ३०

थंडपणानें भाऊ मारिति भावां
दोस्ती दावुनि साधुनि देती दावा !
अन् आईच्या उघड्या डोळ्यांपुढतीं
त्या पुत्रानें याचा प्राणच घ्यावा ! ३१

जिला असावें कालच म्हटलें ‘ बेटी ’
तिला धरावें खुशाल भरल्या हातीं !
आणि अखेरिस झाल्यावर निर्माल्य
तिनें भरावी या झेलमची ओटी ! ३२

शेजाऱ्यांचीं पेटवुनी घरदारें
चिमणीं बाळें फेकिति आंत अरेरे !
झेलुनि त्यांच्या अस्फुटशा किंकाळ्या
झेलमजवळी येउनि रडती वारे ३३

त्या वाऱ्यांची ऐकुनि करुण कहाणी
कोमेजुनि ती गेली ‘ झेलम ’ राणी
आणि म्हणाली, ‘ पाहुनि पशुता यांची
मम हृदयाचें झालें पाणी पाणी ! ३४

पुष्कळ पूर्वीं पाहियला संहार
युद्धामधुनी कोटी सैनिक ठार !
अक्षौहिणि त्या मेल्या कौरवसेना
वेड परी हें सर्वांहुनि अनिवार ! ३५

सिंहव्याघ्रां मानव म्हणतो हिंस्र
अजगर म्हणती असतो फार अजस्र

वेडा मानव या सर्वांहुनि दुष्ट
मारुनि टाकी बांधव कैक सहस्र ! ३६

व्यर्थचि गेली उपनिषदांची वाणी ?
मानव शिकला नाहीं कांहिं कुराणीं ?
व्यर्थ तयाच्या पुढती ठरली गीता !
बुद्ध नि येशू सर्वांवरती पाणी ! ३७

कशी अचानक गेली यांची शुद्ध ?
पाजियली मी मदिरा किंवा दुग्ध ?
कालच होते भासत देवांऐसे
आज तयांचे बनले राक्षस शुद्ध ! " ३८

खूपच केला मग झेलमनें शोक
नको म्हणाली मजला मानवलोक
परतुनि गेली झेलम हिमवंतात
आणि म्हणाली एकच तेथें श्लोक– ३९

" सर्वज्ञ न हे देव–असे तो दंभ
मनुजापुढती ठरले केवळ शुंभ
देवापेक्षां मानव आहे थोर
अमृतघटांचे क्षणिं करितो विषकुंभ " ४०

# तुला नव्या जगाची आण

तुझ्या कामामधुन, तुझ्या घामामधुन, उद्यां पिकंल सोन्याचं रान
चल उचल हत्यार, गड्या होऊन हुषार, तुला नव्या जगाची आण ॥धृ॥

तुझ्या घणाच्या घावामधुन उठे उद्यांच्या जगाची आस
तुझ्या घामाच्या थेंबामधुन पिके भुकेल्या भावाचा घास
तुझ्या ध्यासामधुन, तुझ्या श्वासामधुन, जुळे नव्या जगाचं गान
चल उचल हत्यार....

तुझ्या पोलादी टांचेखालुन जित्या पाण्याचे निघतिल झरे
तुझ्या लोखंडी दंडामधुन वाहे विजेची ताकद खरे
चल मारुन धडक, उभा फोडूं खडक, आतां कशाची भूकतहान
चल उचल हत्यार....

भाग्य लिहिलेलं माझं तुझं घाम आलेल्या भाळावरी
स्वप्न लपलेलं माझं तुझं इथं बरड माळावरी
घेउन कुदळ खोरं, चला जाऊं म्होरं, देऊं देशाला जीवनदान
चल उचल हत्यार....

# तेव्हां आणि आतां

– १ –

नटराज शिवापरि सह्य राहिला उभा
ते हजार बाहू भेदुनि जाती नभा
लोटांगण घाली पदिं कंपित सागर
वरि तृतीय नेत्रापरि जळतो भास्कर
भस्माचे पट्टे सरिता अंगावर
अन् विचित्र दंडकवन जणुं व्याघ्रांबर
किति रम्यभीषणा दिसे सृष्टिसुंदरी
जणुं सह्यशिवाची भिल्लिण ती सहचरी

त्या बिकट गिरींतिल विकट दरीच्या मुखीं
तो असेल बसला पहिला मानव सुखी
कटिभंवतीं कसुनी मृत वैऱ्याचें वस्त्र
तो असेल अपुलें पाजळीत अश्मास्त्र !
मारिला तयानें सखा जियेचा ठार
ती असेल बसली खेटुनि त्याला नार !
हो ! हीच हवी तर त्यानें काय करावें
तें झुरणें तुमचें नव्हतें त्याला ठावें

छे ! गुप्तपणाच्या व्यभिचाराची रीत
त्याकाळीं तितुकी नव्हती व्यवहारांत
याच्याहुन येईल जर कोणी बलशाली
अन् हीच नार जर त्यालाही प्रिय झाली
तर झुंजुनि तो मग घेइल याच्या प्राणा
तो सौदा सारा उघडपणाचा जाणा !
हृदयांत भावना तुफान ताण्डव करिती
त्या नयनांमधल्या ऐन्यामध्यें दिसती

क्रोधानें त्याचें अंग थरारुनि जावें
सौख्यही खदखदां हांसुनिया दावावें
प्रीतीनें व्हावें पुलकित गात्र नि गात्र
भीतीनें त्यानें मिटून घ्यावे नेत्र
पेटली क्षुधा तर रानीं मृग मारावा
अग्नींत धरावा करकर फाडुनि खावा
अन् तृषार्त होतां, अस्थिकपालामाजीं
झेलून धबधब्यामधिल धार झोंका जी !
हृदयांत उसळतां लहर कधीं इष्काची
डोळ्यांत खुपसुनी डोळे प्रमदा खेंची !
मस्तींत यापरी सदा जरी तें फिरणें
तरि वाघ उरावरि घाव करी मग मरणें

मग सहज तुटावा तारा जंव गगनांत
तंव चिज्ज्योती ती मिसळे चैतन्यांत
कीटास खातसे मत्स्य–मत्स्य मत्स्याला
मत्स्याला मानव–वाघ खातसे त्याला
तें होतें जीवन नव्हती जरि शाश्वतता
तें होतें जीवन, संस्कृति तिळभर नसतां
तो चित्‌शक्तीचा खराखुरा अवतार
जरि नव्हता तेथें सभ्यपणा हळुवार
भरभरून वाहे जीवनरस जोमांत
तें होतें जीवन, अचेतनावर मात
अन् आज संस्कृती–सभ्यत्वाच्या गोष्टी
जरि धूम्रास्त्रासह खेळति अमुच्या ओष्ठीं
तरि जीवन अमुचें मृत्युहून कराल
मायेहुन अमुचें फसवें मायाजाल

– २ –

तो प्रचंड गिरि जणुं आज भासतो खुजा
बाहुल्याप्रमाणें इवल्या त्याच्या भुजा
छातींत तयाच्या खिंडारें पाडुनी
धांवती अग्निरथ भराभरा त्यांतुनी

त्या सरिता आतां ओहळ जणुं सानुले
अन् अथांग सागरिं नौका अपुली डुले
सृष्टीस आपुली दासी केली नरें
ही किती करामत–असेल सारें खरें !
आहेत तयानें सुंदर रचिलीं पुरें
अन् पुरांमधोनी अभ्रंकष गोपुरें
गोपुरांपुढें त्या कुबेरवैभव उणें
अन् पंचमहाभूतांचें घरिं राबणें
पृथ्वीच सजविते महाल सुंदर पुरा
अन् आपोआपच आपहि येतें घरा
तेजास खेंचुनी खेळवि तारांतुनी
'वायू' हि गरगरां फिरतो पंख्यांतुनी
'आकाश' ऐकवी नवखंडांतिल गीती
ग्रहगोलांवरुनी फिरेल मानव पुढती
क्षण थांबवुनि हे त्याच्या स्तुतिचे पाठ
जा घरांघरांतुनि–देखा निरखुनि नीट

जा नीट पारखुनि घ्या हो त्याच्या मना
जा कपट पहा तें जिंकाया परधना
त्या विशाल शाला, त्यांतिल संशोधन
कीं क्षणांत कैसें नष्ट करूं जीवन !

झांकाया मानस मानव शिकला कला
हा कपटपटु किती पूर्णपणें जाहला !
वरिवरी हंसोनी कसा गळा कांपावा
मधु बोल बोलुनी कटु द्वेष झांकावा
व्यभिचार गोड तत्त्वांत कसा गोंवावा
फसवून नागवें कसें करावें भावा
दुबळयांचा कैसा धनापहार करावा
वरि दानशूरता दावुनि तो पचवावा
ही आतां नीती— ही सारी मानवता
ही संस्कृति अमुची ही अमुची विद्वत्ता
ही बुद्धि-प्रौढी, सभ्यपणा हा जगतीं
हें जीवन अमुचें युगायुगांची प्रगती !

– ३ –

त्या म्हणा रानटी— करा तुम्ही उपहास
परि हंसेल त्याचा आत्मा आधुनिकांस

# दक्षिण दिशेला

दक्षिण दिशेला माझ्या गांवच्या
नगरशेटीचा बंगला निळा
बारा महिने त्याच्या भंवतीं
जित्या रत्नांची खाण खुलते........

....कुंपणावर बोगनवेल
सांवरी आपुले रंगीन गुच्छ

दाराच्या थिट्या कमानीवरी
कृष्णकमळीचे तेजस्वी डोळे

दोहों बाजूंस
सोन्याच्या गदा घेऊन स्कंधीं
शंखासुरांची खडी ताजीम
त्यांच्या समीप मोहिनीपरी
सायली उधळी यौवनधन

दयार्द्र काळ्या मातींत उभ्या
रोमांचमंथर गुलबछड्या
कोणा बुल्बुलांचीं पाहतां स्वप्नें
गहिवरल्या दहिंवरल्या

कुंजाकुंजांत
जाईजुईंचे प्रीतीसंगम
पहात बसला हांसरा मोगरा

निशिगंधाशीं
रात्र रात्रभर प्रणय करून
दिवसा झोपते रातराणी ही

म्हाताऱ्या टकल्या पडल्या झडल्या
सेनापतीपरी
गतस्मृतींचे बिल्ले लावून
दिमाख दाखवी पांढरा चाफा

प्रौढत्वीं शैशव जपून ठेवी
सोनचंपक

दूर अंतरीं, पुष्करिणीला दुःख सांगते
आंसवें ढाळीत बकुळ खुळी
परसदारीं तिचा लाडका
पारिजातक उसासे टाकी
प्रेमिक दोघे, समीप दोघे
स्थावर म्हणून सदा विरही !

चिरनूतन फुलांचा शेला
पांघरी सदा हा बंगला निळा

त्याच्या पाषाण देहावरती
फिदा झालेली मधुमालती
मग्न जाहली दृढालिंगनीं

असाच एकदां फिरत फिरत
शिरलों सहज
नगरशेटीच्या कुंपणाआंत
मोहरे भोंवतीं सुगंध नगरी
चिरयौवन चिरजीवन

मनांत आलें
भेटून जावें तिच्या धन्याला,
नगरशेटीला
निळ्या बंगल्याचें खुले कवाड
आणि समोर....हाय समोर
कांतीव शिसवी मेजावरतीं
स्फटिकधवल कांचपात्रांत
कागदी फुलें! कागदी फुलें!!

दा. क्र.

# बरी केली झांकापाक !

काळयाशार रस्त्यावर गंजलेल्या सांजकाळीं
उमटत गेली तुझी शुभ्रसुंदर झळाळी
तुझ्या तारुण्याची आतां गेली उमलून कळी
दावी टपोर गौरव आतां पाकळी पाकळी
तरी तुझ्या चालीमधें ऐट अजब वेगळी
एक धीटता मोकळी
एक मिजास निराळी !

समाधानाची सौम्यता तुझ्या गालांच्या रंगांत
आत्मतृप्तीचें चांदणें तुझ्या अंगप्रत्यंगांत
नाहीं उन्माद-उन्मेष तुझ्या वस्त्रतरंगांत
नाहीं उर्मट ऊर्मि ती तुझ्या भ्रुकुटिभंगांत
नाहीं उदास सांवली तुझ्या उजळ जगांत
नाहीं बिजली ढगांत
नाहीं प्रळय युगांत !

आणि तरी डोळेभेट होतां अशी अचानक
तुझ्या अंतरींची नौका डगमगली क्षणैक
गंगेमधें मिसळली छटा यमुनेची एक

झडे प्रफुल्ल पद्मांत
काहीं झालें नाहीं जसें

हेमन्ताचा हिमसेक
अशी मुखावरी झांक
गडे गेला होता झोक
बरी केली झांकापाक !

# आली जगबुडी आली

भरा अखेरचा पेला
आली जगबुडी आली
सरे युगांचा विरह
पृथ्वी परत निघाली

होती निळ्या अनंतांत
जशी कमळाची कळी
आठ दिग्गज मातले
जो तो शुंडेंत कवळी

बारा आदित्य ओढति
एका सखीला जवळी
तळ्यांतील वाळूवर
संथ करपे मासळी

आतां थोडे क्षण बाकी
यावें यावें चंद्रावळी
आहे अन्तिम मीलन
दावा गोड उताविळी

नको खेद करूं साकी
नाहीं मैफल संपली
बागेसरी कोळपली
तरी भैरवी आपली

# ठोकळ्यांचें घर

किती वर्षें मुकाट्यानें
ठोकळ्यांचें घर आहे बसलों रचित
आज अशी सोसाट्यानें
कशासाठीं सांग इथें येसी अवचित
धुंद तुझ्या निःश्वासानें
सहजच उगीचच उधळसी घर
आतां पुन्हा विश्वासानें
घरकुल मांडायचा नाहीं मला धीर

तुझ्या माझ्या जीवनाच्या
कक्षा दुभंगून गेल्या मुग्ध यौवनांत
तुझ्या माझ्या यौवनाच्या
कळ्या कोमेजून गेल्या दग्ध जीवनांत
लोकलाजेच्या धगींत
मीलनाची आशा आहे गेलेली जळून
झाली वंचना सुगींत
किती उशीरां ग वर्षें ! येसी कोसळून

नको येऊंस जवळ
बरी रेंगाळते मनीं तुझी आठवण

वरी सांचलें शेवाळ
तरी पुष्करणीमाजीं हसे कमळण
आहे जिवंत अजून
पोखरल्या कळीमधें सुगंधाची खूण
जातों लाजून थिजून
तुझ्या पहिल्या प्रीतीचें आठवून ऋण

# खडकावरलें पिंपळपान

रोज सकाळीं रविकिरणांसह
युद्धकहाण्या घुसती नेत्रीं
आणि भयाचा बुरखा घेउन
फिरतों आम्ही दिवसा रात्रीं

जिजीविषेला विष घालाया
अस्मानी सुल्तानी झटती
भवितव्याच्या भीषणतेला
भिउनि पावलें मागें हटती

मूक मनाच्या दारावरतीं
विषण्णतेचा ओढुन पडदा
खिन्नपणें पुटपुटतों आम्ही
'मानवतेचा पडला मुडदा'

असा एकदां बसलों होतों
शून्य मनाचें घुमवित गान
तों दिसलें मज खडकावरती
लवलवणारें पिंपळपान

लाव्हा ओतुन जाळियलेलें
गरिब बिचारें पिंपळपान

सात युगांनीं चेंगरलेलें
हळवें हिरवें पिंपळपान

या खडकाच्या छाताडावर
गातें अपुलें अक्षय गान
मरगळलेल्या मनास माझ्या
देउन गेलें जीवनदान

अणुभंगांतिल ब्रह्मास्त्राला
खुशाल माना कुणि प्रलयंकर
पिंपळपानावर सृजनाचा
परमात्मा हांसतो शुभंकर

कोलाहल जरि वातावरणीं
हालाहल जरि दिशांत दाही
तरि पानावर पाषाणाचा
विजय कदापी नाहीं नाहीं!

# सांग शिल्पिन् !

कलाचतुर शिल्पकारानें
पाषाणांतुन निर्मिली एक रतीची मूर्ती
पत्थराचें तें फूलच जसें

रात्रंदिवस टाकीचे घाव झेलून उरीं
प्रसवे शिळा रतीची मूर्ती
शिल्पकाराची जाहली कीर्ती
दाही दिशांत

देशोदेशींचे रसिकश्रेष्ठ वानूं लागले
रतीमूर्तीच्या सौन्दर्यरेषा
कोणी म्हणाले
अंगकांती ही आरसपानी तजेलदार
कोणी म्हणाले
नयनामध्यें हिच्या तरळे मूर्त शृंगार
कोणी म्हणाले
पारिजाताच्या तांबुस छटा कपोलांवर
कोणी म्हणाले
जिवंत जणुं चालली रती
कुणा रुचती तिच्या देहाचीं अर्धवर्तुळें

कुणाला तिचे मृदु तळवे
कुणाला बाहू
कुणा पावलें....
कुणाला एकूण सौंदर्योल्लास
कुणाचें कांहीं कुणाचें कांहीं....

चाले सर्वत्र
एकच भाषा
'कलाचतुर शिल्पकारानें
पाषाणांतून निर्मिली एक रतीची मूर्ती
पत्थराचें तें फूलच जसें'

शिल्पकाराच्या श्रमल्या देहीं
पुष्पहारांचा पडला खच
स्तुतिपुष्पांचे तुरे शोभले त्याचिया कानीं
अज्ञ रसज्ञ जनता करी कौतुक त्याचें
आणि तयाची सखी शेजारीं
चेपत होती त्याचे तळवे
म्हणत होती, 'किती ग बाई थकला राजा
किती सुंदर घडली मूर्ती
कुठें शिकला कलाचातुरी?'

त्याच्या अधरीं स्मित सारखें
निमिषमात्र, मात्र मधेंच

तीव्र वेदना....
जाईजुईंत कृष्णकमळ तशी चमके....

आणि त्याची मी जाणली व्यथा
उभा ठाकलों त्याच्यापुढतीं
करांत माझ्या नव्हता हार
मुखांत माझ्या कठोर सत्य रेंगाळे जरा
अखेर झाला सत्याचा स्फोट

‘ सांग शिल्पिन्—
अरे उन्मन कलाचतुरा
सांग एकदां—
स्तुतीचीं स्तोत्रें ऐकलींस तूं
घेतलेस तूं गळ्यांत हार
उन्नतनासा लोललोचना पुष्टयौवना
रतीची मूर्ती घडलीस तूं—
परंतु आहे जाणीव तुला—ही तों वेगळी !
स्वप्नापेक्षां ही पार निराळी
मनाच्या तुझ्या उद्यानामध्यें
फुलली कळी—तीच नव्हे ही !
चांदण्या रात्रीं मनाच्या तुझ्या शिंपल्यामध्यें
पडे किरण एका स्वप्नाचा
स्वप्नांत तुझ्या जन्मला मोती

तोच नव्हे हा....
कुठें तें स्वप्न कुठें ही मूर्ती
तया रतीचें व्यंगचित्र हें—,

शिल्पीचे नेत्र
आर्तपणानें व्याकुळ झाले
माझियाकडे पाहिलें त्यानें केविलवाणें
आणि तोलला हातीं हातोडा
बळ आणून शिणल्या देहीं
उंच उचली आपुला हात
एका क्षणांत
रतीची मूर्ती झाली उध्वस्त
कलाचतुर पुटपुटला
'मायाविनी गे, नव्हेस तूं ती !'

लोक म्हणाले, 'वेडा जाहला हर्षवायूनें
बिचारा शिल्पी'

# फलश्रुति

उभा माझ्या अंगणांत वटवृक्ष पुरातन
नांदतसे सावलींत शंकराचें आयतन
त्याच्या गाभाऱ्यांत आहे नंदादीप अविनाशी
परी चार वर्षें झालीं शिवशंकर उपाशी
खाई पुजारी तुपाशीं !

घरांतच भाविकांची आहे पुरेपूर दाटी
त्यांत पंचखंडांतील भक्त येती भेटीसाठीं
गंगा, नील, तमसा अन् सात समुद्रांचें नीर
आणुनियां न्हाणितात पंचखंडांतील वीर
इथें तीर्थाचा बाजार !

माझा शंभु भोळाखुळा घेई सर्वांचीच पूजा
खऱ्यापेक्षां खोट्याचीच चाले आजकाल मजा
शंभु शांभवी घेऊन झोपे आपुल्या तारेंत
हात धुतात पुजारी त्याच्या गंगेच्या धारेंत
बरा जमलासे बेत

मीच माझ्या घरामधें झालों आज परदेशी
माझ्या देवळांत मीच उभा कष्टानें दाराशीं

कुठवर पाहूं शंभो तुझ्या जागृतीची वाट ?
कुठवर साहूं शंभो बडव्यांचा थाटमाट ?
प्रसादाला आणे आठ !

सं. नं.

# हिरवा मजला

गढी आज उध्वस्त जाहली
भुंडें झालें नारळझाड
वंशावळिवर जगे वाळवी
सात पिढ्यांचा सुकला आड

पेशवाइ पटई डगमगली
पणजोबांचें जाजम विटलें
देवघरांतील देव भंगला
आजोबांचें घड्याळ फुटलें

गढी कधींतरि गोकुळ होती
भरला होता नारळशेंडा
एकापेक्षां एक सवाई
गेले मिरवुन अपुला झेंडा

पटई पहिली सुंदर भक्कम
जाजमावरी बसले राजे
आजोबांचें घड्याळ सुंदर
शंभरवर्षांपूर्वि विराजे

असेल सारें खरें खरें वा
याहुन मोठें असेल वैभव

गढी आज उध्वस्त जाहली
हें चक्षुवैं आहे वास्तव

मुस्कट झाल्या शेल्यावरलें
कुस्करलेलें पाहुन फूल
रडायचें तर रडा बापुडे
अम्हां विणूं दे नवें दुकूल

जुन्या घराच्या थडग्यावरती
नव्या थराचा बांधूं इमला
त्याच्या थडग्यावरती माझा
पणतू बांधिल हिरवा मजला

# जायचेंच ना

जायचेंच ना ? लवकर जा तर
रेंगाळत मधुरजनीपरि तूं करूं नको ग अंतर कातर

फिरून येशिल इकडे जेव्हां
विसरुन ये तव घड्याळ इवलें, विसरुन ये मिनिटांचा पंजर

विसर सफाई प्रसाधनाची
इस्त्रीची अन् टापटिपीची विसरुन ये तव नीती नागर

विसरुन ये वेणींतिल गजरा
विसर मुलायम रेशिम झालर, विसर तुझे किणकिणते बिल्वर

विसर सये गतिवाचक भाषा
विसर विसर तीं कालवाचकें—जलद, भराभर, झरझर, लवकर

विसर सांज अन् दिवेलागणी
ध्रुवावरिल रात्रीपरि येई गूढ मनोहर घालित पांखर

प्रशांत सागरलहरीपरि तूं
कंपित आतुर अंतर झांकित संथगतीनें ये मदमंथर

# जयकेतू

उल्लंघुन कक्षाकारा
मी निखळुन पडलों तारा
मज न्हता—आणिक नको कधींच—किनारा

मी अपवादाचा यात्री
मी तर्करवीची रात्री
मी जन्म घेतला गाधिजमुनिच्या गोत्रीं

मी सूत्राविण वर सरतों
मी अतल नभीं भिरभिरतों
मी जाइन तेथें खपुष्प वेंचित फिरतों

मी अहेतुकाचा हेतु
मी अपार्थिवाचा सेतु
मी धूमकेतुच्या वंशाचा जयकेतु !

# कांहीं घडे जगावेगळें

अंगण धूसर निळें, मधोमध चंद्राभंवतीं खळें
इकडे तिकडे विखरुन पडले विझलेले भुइनळे

कुन्द दिशांनीं कुन्तल कुरळे विस्कटले मोकळे
त्यांतुन गळले नभपुष्पांचे अर्धोन्मीलित कळे

वंचित खंडित धरा तळमळे, हळवें जळ डुचमळे
नागरिकाच्या निःश्वासासम वारा हळु झुळझुळे

विरही वन सळसळे, ढाळतो पिंपळ पिंवळीं दळें
मळल्या वाटेवरी कशितरी रेंगाळति हीं पळें

खिन्नपणाचा गंज चढुनियां फिक्कट भूमंडळें
उदासतेला वरदानच जणुं अमरपणाचें मिळे

तोंच–अगाई–रातराणिचा पदर सुगंधी ढळे
आणि माझिया जगांत कांहीं घडे जगावेगळें

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८७

# मी एकला मी एकला

मी एकला मी एकला
मजभोंवती सखिसोयरे मजभोंवती नित गल्बला
तरि अंतरीं अशरीरिणी म्हणते मला तूं एकला
सखिच्या गळां कर गुंफतां, आलिंगतां, मुख चुंबतां
कळतें मला कीं तत्त्वतां मी एकला मी एकला
फिरतां पथीं भुवनीं वनीं हंसतां सुहृज्जनमीलनीं
कळतें मला मनच्या मनीं मी एकला मी एकला
असतां सभासंमेलनीं मी बोलतों हंसतों तसा
परि पद्मपत्रमिवाम्भसा मी एकला मी एकला
व्यवहारवीर कधीं कुणी मज सांगती अपुल्या कथा
मज आकळे माझी व्यथा मी एकला मी एकला
यांच्या जगांतिल भूषणें माझ्या जगांतिल दूषणें
मग हांसुनी मज मी म्हणे मी एकला मी एकला
कुणि कीर्तिच्या शिखरावरी काकापरी कोकावतो
माझ्या मनीं पिक बोलतो मी एकला मी एकला
वरि जे मला सत्कारती मनिं मी तया धिक्कारतों
ओंकार हा हुंकारतो मी एकला मी एकला
टाकूनियां सखिसोयरे एकान्ति मी जंव एकला
हें एकलेंपण संपुनी माझे सुहृद् मिळती मला

★ ★ ★

REFBK-0007839

REFBK-0007839